

# ...आणि अस्वातंत्र्याचं वास्तव

ज्येष्ठ कृतिशील अभ्यासक आणि परिवर्तनाचा वाटसरूचे लेखक-हितचिंतक प्रा. आनंद तेलतुंबडे यांच्यावर ते 'शहरी नक्षलवादी' असण्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. हा खोटा आरोप रद्द करावा अशी आनंद यांनी दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यापुढे सक्षम न्यायालयाकडून जामीन मिळवण्याची धडपड करणे आणि तो मिळाला नाही तर तुरुंगात जाणे हे दोनच पर्याय आनंद यांच्यासमोर उभे आहेत. शासन व न्यायपालिका आपल्याला न्याय देतील असे आता त्यांना वाटेनासे झाले आहे. अशा परिस्थितीत जनमताचा दबाव निर्माण होण्याची गरज आहे. या संदर्भात त्यांनी आपल्या मित्रांना जे पत्र लिहिले आहे त्या पत्रातील संपादित अनुवादित अंश (अनुवाद : राहुल कोसंबी) वाचकांसाठी देत आहोत. तसेच त्यांचे इपीडब्ल्यू आणि वाटसरूत आलेले तीन महत्त्वपूर्ण लेख पुनर्मुद्रित करीत आहोत. त्याशिवाय इपीडब्ल्यूचे माजी संपादक सी. राममनोहर रेड्डी आणि कॉ. उदय नारकर यांनी आनंद यांच्या समर्थनार्थ लिहिलेले लेखही देत आहोत.

आनंद, राज्यपुरस्कृत दहशतवादाविरुद्धच्या या लढाईमध्ये आम्ही तुमच्यासोबत आहोत!

**संपादक**

**अस्वातंत्र्याचं वास्तव**

# मला तुमच्या पाठिंब्याची गरज आहे...

## आनंद तेलतुंबडे

लेखक गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे वरिष्ठ प्राध्यापक असून लोकशाही हक्क संरक्षण संघटनेचे कार्यकर्ते आहेत.
ईमेल- tanandraj@gmail.com

तुम्हाला प्रसारमाध्यमांतून हे समजलेच असेल की पुणे पोलिसांनी माझ्याविरोधात दाखल केलेली खोटी एफआयआर रद्द करण्याची माझी याचिका सर्वोच्च न्यायालयाने १४ जानेवारी रोजी फेटाळून लावली. सुदैवाने, सक्षम न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी मला चार आठवड्यांची मुदत देण्यात आलेली आहे. पोलिसांनी माझ्यावर जे काही तथाकथित आरोप केले होते त्याची सुनावणी न्यायालयासमोर होताच ती बनावट गुन्हेगारी असल्याचे सिद्ध होईल याबाबत आतापर्यंत मला पूर्णत: खात्री होती आणि त्यामुळे यासंदर्भात तुम्हाला तसदी देण्याची मला तशी गरजही वाटली नव्हती. पण माझ्या या आशेला संपूर्णत: तडा गेला आणि सध्या पुण्याच्या सत्र न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत जामीन मिळवत राहण्यापलीकडे माझ्या हाती काहीही उरलेले नाही. मला या अटकेच्या संकटातून वाचवण्यासाठी माझ्या बाजूने विविध संघटनांतील, विभागांतील लोकांद्वारे दृश्य मोहीम उभारण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे.

आपल्यापैकी बऱ्याचजणांना हे माहीत नसेल की यूएपीए अंतर्गत अटक होणे म्हणजे अनेक वर्षांचा तुरुंगवास. एखादा खतरनाक गुन्हेगारदेखील त्याच्या गुन्ह्यासाठी केवळ एक किंवा दोन वर्षांच्या सश्रम कारावासानंतर सुटू शकतो. परंतु सदैव राज्यकर्त्यांच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या पोलिसांनी जर त्यांच्याकडे यूएपीएअंतर्गत फक्त पुरावा असल्याचा दावा जरी केला तरी एखाद्या निष्पाप व्यक्तीच्या वाट्याला मात्र अनेक वर्षांचा तुरुंगवास येऊ शकतो.

भारतामध्ये राज्यसत्तेची दमनयंत्रणा चोर आणि लुटारूंना वाचवण्यासाठी सूडबुद्धीने देशातील निष्पाप लोकांना गुन्हेगार ठरवत असून ही गोष्ट या देशाला जगातला सर्वात विषमतावादी देश म्हणून ओळख मिळवून देतेय असं नाहीये. पण ज्या पद्धतीने मागच्या वर्षी पुणे येथे घडलेल्या एल्गार परिषदेसारख्या एका निरुपद्रवी घटनेतून देशातील तीव्र मतभेदाचा आवाज संपूर्णत: दडपण्यासाठी निवडक मानवाधिकार कार्यकर्त्यांना, बुद्धिवंतांना, विचारवंतांना आणि जन चळवळीतील कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्याचा जो गुन्हेगारी फार्स रचला जात आहे, तो त्याच्या उघड नग्नतेत आणि सत्तेच्या अनिर्बंध निर्लज्ज गैरवापरात अभूतपूर्व ठरला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील हा सर्वांत अधम असा कथित कट

आहे, जो राज्याने त्याच्या टीकाकारांविरुद्ध सर्व प्रकारच्या लोकशाही मर्यादा सोडून सूडबुद्धीने पेटून उठून रचलेला आहे.

### कथित कटकर्ते आणि मी

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती पी. बी. सावंत आणि मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांनी १८१८मध्ये भीमा-कोरेगाव येथे झालेल्या अंतिम अँग्लो-मराठा लढाईच्या २००व्या वर्धापनदिनानिमित्त तेथे जमलेल्या लोकांना भाजपच्या सांप्रदायिक आणि जातिवादी धोरणांविरुद्ध एकत्र आणण्याचा विचार पक्का केला. त्यांनी कार्यकर्त्यांना आणि पुरोगामी विचारवंतांना नियोजन बैठकीसाठी आमंत्रित केले. मलासुद्धा कोणीतरी सुरुवातीला न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांच्यावतीने आणि नंतर बी. जी. कोळसे पाटील यांच्यावतीने आमंत्रित केले होते. माझ्या अकादमिक व्यस्ततेमुळे उपस्थित राहू न शकण्याविषयी मी खेद व्यक्त केला पण इतर अनेक जणांसोबत परिषदेचा सह-संयोजक म्हणून सामील होण्याची त्यांची विनंती मी मान्य केली. व्हॉटसॲपवरील एल्गार परिषदेसंबंधीतील पत्रक पाहण्यापूर्वीपर्यंत त्याविषयी थेटपणे काहीही माझ्या ऐकिवात नव्हते. अन्यायी पेशवाईच्या अंताचे आणि भीमा-कोरेगावच्या दगडी विजय-स्तंभावर नाव कोरलेल्या महार सैनिकांच्या हौतात्म्याचे स्मरण करण्याच्या कल्पनेला माझे समर्थन होते. पण पेशव्यांच्या ब्राह्मणी सत्ता काळातील जुलुमी दडपशाहीचा बदला घेण्यासाठीच महार सैनिकांनी भीमा-कोरेगावची लढाई जिंकली होती, असे जे एल्गार परिषदेत प्रक्षेपित केले जात होते ते मला अस्वस्थ करणारे होते. इतिहासाचे हे असे विकृत वाचन पुढे जाऊन दलितांना अस्मितावादाने आणखी जास्तच पछाडून टाकेल आणि लोकांचे व्यापक ऐक्य घडवून आणण्याच्या मार्गात मोठी अडचण ठरेल, असे मला वाटले. मी याविषयी 'द वायर'मध्ये एक लेख लिहिला, ज्यामुळे मला दलितांच्या संतापजनक प्रतिक्रियाही सहन कराव्या लागल्या. मी या संपूर्ण प्रकरणाचा पुनर्विचार केला आणि तरीही माझ्या भूमिकेवर ठाम राहिलो, खऱ्या विचारवंताच्या प्रामाणिक तत्त्वाला जागून. त्यामुळे, मी माझ्याच मतांवर पुन्हा पुन्हा ठाम राहिल्याने ह्या लेखाला जो प्रतिसाद मिळाला, त्यावरून तरी मी कोणाच्यातरी हुकुमाने काम करून दलितांना चिथावतो हा जो दोषारोप माझ्यावर केला जातो, तो समूळ उखडून टाकायलाच हवा. पण जिथे सर्वोच्च दर्जाच्या अतार्किकतेचा सुकाळ आहे तिथे असा तर्क राज्य किंवा तिच्या पोलिसयंत्रणेसह कुठल्याही प्रकारचा गैरसमज तोडूच शकत नाहीत!

२५०पेक्षाही अधिक संघटना या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या, त्यापैकी काही मराठा संघटना होत्या, ज्या भूतकाळात कधीही दलितांसोबत राजकीयदृष्ट्या एकत्र आल्या नव्हत्या. राज्यात जेव्हापासून भाजप-शिवसेना युतीचे सरकार ब्राह्मण मुख्यमंत्र्यांच्या मुखत्यारीत आले तेव्हापासूनच मराठ्यांचा असंतोष वेगवेगळ्या स्वरूपात आविष्कृत होत होता, त्यांपैकी अर्थातच सर्वांत मोठा असंतोष म्हणजे मराठा मोर्चा, ज्याचा स्फोट कोपर्डीतील दुर्दैवी घटनेच्या नाममात्र सबबीखाली झाला, ज्यात अल्पवयीन मराठा मुलीवर काही समाजकंटकांनी बलात्कार करून तिचा खून केला होता, आरोपींमध्ये एक दलितही सामील होता. यावर प्रशासनाने तातडीने कारवाई केली आणि म्हणूनच पीडितेला न्याय मिळण्याच्या कायदेशीर मागणीला कलाटणी मिळत ती थेट ॲट्रॉसिटी कायदा रद्द करण्याच्या असंबद्ध मागणीपर्यंत येऊन पोहोचली. नंतर मात्र मोठ्या प्रमाणावरील लोकांची ही जमवाजमव मराठ्यांसाठी आरक्षणाच्या मागणीसाठी वापरली गेली. राज्यातील ब्राह्मणी संकेत-मान्यतेला पराभूत करण्यासाठीच केवळ मराठ्यांना दलितांसोबत एकत्र येण्याची निकड जाणवायला सुरुवात झाली होती. याचे प्रतिबिंब एल्गार परिषदेच्या आयोजकांसोबत जोडल्या गेलेल्या

मराठ्यांच्या काही युवा संघटनांमध्ये उमटलेले दिसते, म्हणूनच त्यांच्या या भावनेचा प्रतिध्वनी 'पेशवाईला गाडा' या घोषणेतून निनादला होता.

हे फक्त प्रतीकात्मक होते पण तसं पाहू गेल्यास तो भाजपच्या रथासाठीचा आगाऊ सूचित धोकाही सिद्ध होऊ शकतो. तसेच परिषदेचे दोन्हीही मुख्य आयोजक योगायोगाने मराठाच होते. याने सत्तालोलुप भाजपला घाबरवून सोडले आणि प्रतिक्रिया म्हणून त्याने दलित आणि मराठ्यांमध्ये फूट पाडण्यासाठी समरसता हिंदुत्व आघाडीच्या मिलिंद एकबोटे आणि शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या संभाजी भिडे यांच्या रूपात चिथावणीखोर एजंट पेरले. भीमा-कोरेगावपासून फक्त चार किमी अंतरावरील वढु बुद्रुक येथील शिवाजी महाराजांच्या पुत्राची म्हणजेच संभाजी महाराजांची समाधी हा कट शिजवण्यासाठी वापरली गेली. गत ३०० वर्षांतील समाधीच्या प्रसिद्ध इतिहासावरून, जेव्हा औरंगजेबाने संभाजीराजांना ठार मारले आणि त्यांच्या मृतदेहाचे तुकडे करून इतस्ततः विखुरले, तेव्हा गोविंद महाराने हे तुकडे एकत्र करून संभाजीराजांचा यथोचित सन्मानाने अंत्यसंस्कार पार पाडला. त्याने स्वतःच्या शेतात त्यांचे स्मारक बांधले. जेव्हा त्याचे निधन झाले तेव्हा त्याच्या कुटुंबीयांनी संभाजीराजांच्या समाधीशेजारीच त्याचेही स्मारक बांधले. या दोघा कटकर्त्यांनी मात्र, गोविंद महाराने नाही तर 'शिवले' या मराठा कुटुंबाने ही समाधी बांधली असे बनावट कथन रचले आणि मराठ्यांना दलितांविरोधात भडकवले. वढु बुद्रुक येथील या फुटीचा वापर करून १ जानेवारी २०१८ रोजी भीमा-कोरेगाव येथे होणाऱ्या दलितांच्या एकत्रिकरणाच्या विरोधात मराठ्यांना चिथावण्यात आले. सभोवतालच्या गावांमध्ये याची होत असलेली तयारी लोकांना स्पष्ट दिसत असूनही प्रशासनाने मात्र अज्ञानाचे चांगलेच ढोंग वठवले. २९ डिसेंबर २०१७ रोजी दलितांना गोविंद महार यांच्या समाधीचे छत आणि माहितीफलक मोडक्या अवस्थेत आढळून आले. रचलेल्या कटानुसार दोन्ही समुदायांमध्ये तणाव तर उद्भवला मात्र कटकर्त्यांच्या दुर्दैवाने गावकऱ्यांनी दुसऱ्याच दिवशी सामोपचाराने हे प्रकरण मिटवले.

३१ डिसेंबर २०१७ रोजी शनिवारवाडा या नियोजित ठिकाणी एल्गार परिषद झाली. परिषदेच्या शेवटी, तिथे उपस्थित सर्व लोकांनी भाजपला मत न देण्याची आणि भारतीय संविधानाचे संरक्षण करण्याची शपथ घेतली. त्या संपूर्ण परिषदेचे व्हिडिओ-रेकॉर्डिंग पोलिसांनी आणि आयोजकांनीही केले होते. परिषदेच्या ठिकाणी काहीही अनिष्ट घडले नाही आणि सर्व प्रतिनिधी शांतपणे तिथून गेले. माझं म्हणाल तर, मी माझ्या एका जवळच्या मित्राच्या मुलाच्या लग्नासाठी ३० डिसेंबर २०१७ रोजी सकाळी १०:५५ वा. पुण्यात आलो होतो. आम्ही श्रेयस हॉटेलमध्ये थांबलो होतो आणि दुसऱ्या दिवशी ३१ डिसेंबर २०१७ला लग्नाला जाऊन आल्यावर १२:४० वा. गोव्याला परतण्यासाठी आम्ही हॉटेल सोडले. पुण्यात आल्यावर माझ्या पत्नीला तिच्या भाच्याला (सुजात आंबेडकर) आणि वहिनीला (अंजली आंबेडकर) शनिवारवाड्यावर भेटावेसे वाटले म्हणून मग आम्ही केवळ ५-१० मिनिटांसाठी तिथे फेरफटका मारला आणि टायर दुकानाच्या शोधात तिथून लगेच बाहेर पडलो कारण माझ्या कारच्या एका चाकाला चीर पडली होती त्यामुळे तो बदलायचा होता. सुदैवाने, माझ्यापाशी मी कुठल्या वेळी कुठे उपस्थित होतो आणि आम्ही एल्गार परिषदेत उपस्थित नव्हतो हे सिद्ध करणारे अचूक पुरावे उपलब्ध आहेत. पुण्यात आलेलो असताना, मला परिषदेत सहजच जाता आले असते मात्र परिषदेच्या उद्देशांबाबतच्या माझ्या मतभेदांमुळे आणि मला इन्स्टिट्यूटच्या कामांसाठी लवकरात लवकर परतायचे असल्यामुळे, मी तिथे जाणे टाळले.

१ जानेवारी २०१८ रोजी जेव्हा भीमा-कोरेगाव येथे दलित एकत्रित आले, तेव्हा हिंदुत्ववादी गुंडांनी नियोजित पद्धतीने हल्ला चढवून रस्त्याला लागून

असलेल्या घरांच्या गच्च्यांमधून दगडफेक करायला, लोकांना मारहाण करायला आणि स्टॉल्स जाळायला सुरुवात केली. पोलिसांची संख्याही कमी होती आणि त्यांनी निव्वळ बघ्याची भूमिका निभावली, यावरून प्रशासनाचा या योजनेत सहभाग होता ही बाब स्पष्टच होते. त्या परिसरात काहीतरी कटकारस्थान शिजतंय याची चाहूल जवळजवळ सर्वच सामान्य लोकांना कधीचीच लागली होती. २९ डिसेंबर २०१७च्या संभाजींच्या समाधीच्या घटनेने तर या अफवांना अधिकच बळकटी मिळाली होती. पण प्रशासनाने आपल्या ढोंगी अज्ञानाने ही दंगल जाणीवपूर्वक घडू दिली. व्हॉटसॲपवर सगळीकडे फिरणाऱ्या व्हिडिओमध्ये भगवे ध्वजधारी लोक एकबोटे आणि भिडे यांच्या नावाने घोषणाबाजी करत काय चाललंय याची खबरबात नसलेल्या दलितांची धरपकड करून त्यांना जबर मारहाण करताना स्पष्टपणे दिसत आहेत. असंख्य दलित जखमी झाले, त्यांच्या वाहनांचे नुकसान करण्यात आले, अनेक स्टॉल्स जाळण्यात आले आणि तरुणांना मारहाण करण्यात आली. एल्गार परिषदेत काय घडलं याची किंवा अगदी १ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या हल्ल्याबाबत, त्या दिवशीच्या दुपारी २ जानेवारी २०१८ रोजीच्या 'द वायर'मध्ये येणाऱ्या माझ्या लेखाविषयी संपादक सिद्धार्थ वरदराजन यांनी माझ्याशी इमेलवर संवाद साधेपर्यंत मला किंचितही कल्पना नव्हती.

**पोलिसांना खुली सूट**

२ जानेवारी रोजी सामाजिक कार्यकर्त्या आणि बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या सदस्या, अनिता रवींद्र साळवे यांनी आदल्या दिवशी दलितांवर झालेल्या हल्ल्याला जबाबदार गुन्हेगार म्हणून एकबोटे आणि भिडे यांच्यावर नावानिशी शिक्रापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर कसलीच कारवाई करण्यात आली नव्हती. ३ जानेवारी २०१८ रोजी, प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली जी ४ जानेवारी २०१८लाही कुठलीच अनिष्ट घटना न घडता उत्स्फूर्तपणे पाळण्यात आली. यानंतर, पोलीस कारवाईस आरंभ झाला आणि चक्क हिंसा उसळवण्याच्या खोट्या सबबीखाली दलित तरुणांच्या अटकसत्राला सुरुवात झाली. ८ जानेवारी २०१८रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अधिकारी आणि संभाजी भिडेंचा अनुयायी असलेल्या तुषार दामगुडेनामक व्यक्तीने एल्गार परिषदेत दिल्या गेलेल्या प्रक्षोभक भाषणांमुळे १ जानेवारी २०१८ची हिंसा उसळली, असा दावा करत परिषदेचे आयोजन केले म्हणून कबीर कला मंचच्या काही कार्यकर्त्यांच्या नावे एफआयआर दाखल केली. प्रथमदर्शनी हा एक हास्यास्पद दावा आहे. प्रथमतः, पोलीस स्वतःच या संपूर्ण एल्गार परिषदेच्या कार्यवाहीचे साक्षीदार होते आणि ह्या दाव्याची सत्यता पडताळून पाहाण्यासाठी त्यांच्यापाशी परिषदेचे संपूर्ण व्हिडिओ रेकॉर्डिंगही उपलब्ध होते. जर खरोखरच तिथे प्रक्षोभक भाषणबाजी झाली असती तर, त्यांनी स्वतःच एफआयआर दाखल करून वक्त्यांविरोधात कारवाई केली असती. नऊ दिवसांनी कोणीतरी येऊन एफआयआर दाखल करण्याची वाट पाहाण्याची त्यांना काहीही गरज नव्हती. आणि, एल्गार परषदेतली चिथावणी केवळ दलितांनाच उद्देशून होती असे म्हटल्यास, त्यांनाच भडकवले जात असताना त्यांनीच मार कसा बरं खाल्ला? या दंगलीत, एका युवकाला आपल्या प्राणास मुकावे लागले, जो सुरुवातीला दलित समजला गेला होता. तथापि, पोलिसांनी आपल्या नियोजित पटकथेच्या अंमलबजावणीसाठी ती उचलली होती. त्यांनी प्रथितयश लोकांच्या घरांवर धाडी टाकल्या. परिषदेचे मुख्य आयोजक असलेल्या न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील आणि न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांनी, या परिषदेच्या आयोजनासाठी आम्हाला कुठल्याही प्रकारच्या पैशांची गरज भासलेली नाही असे जाहीरपणे विधान करूनही त्याकडे साफ दुर्लक्ष करीत पोलिसांनी अल्पशा खोट्यानाट्या सुगाव्याच्या

बळावर एल्गार परिषदेला माओवाद्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे निधी पुरवला असल्याचा युक्तिवाद करायला सुरुवात केली. या घटनेला माओवाद्यांचे मोठे कारस्थान म्हणून वळण लावण्याआधी आणि न्यायालयाला त्यांच्या या खोट्या दाव्यांवर विश्वास ठेवायला भाग पाडण्याआधी, पोलिसांनी त्यांच्या अनुमानांची पडताळणी करण्यासाठी या दोन न्यायमूर्तींची साधी चौकशी करण्याची तसदीही आजपर्यंत घेतलेली नाही! आरोपपत्रात, त्यांनी न्यायमूर्ती पी. बी. सावंतांचे जे वक्तव्य संलग्नित केले आहे, ते खरंतर त्यांनी जाहीरपणे नाकारलेले वक्तव्य होते. असे झाले तरी, इतका मोठा गंभीर गुन्हा न्यायालयाकडून दुर्लक्षितच राहिला.

माओवादी निधीपुरवठा सिद्धांताच्या खोट्या सबबीसह, पुणे पोलिसांनी, 'संयुक्त ऑपरेशन'अंतर्गत नागपूर, मुंबई आणि दिल्लीच्या पोलिसांशी दृढ समन्वय साधून ६ जून २०१८ रोजी पाच कार्यकर्त्यांच्या घरांवर धाडी टाकून त्यांना अटक केली. ते तर दूर दूरपर्यंत एल्गार परिषदेशी संबंधित नव्हतेच. मात्र अटक केल्यापासून, पोलीस खोट्या कथानकांचे जाळे विणताहेत – भीमा कोरेगाव स्मारकाचा वार्षिक उत्सव साजरा होत असताना उफाळलेल्या हिंसेमागे ह्या पाच व्यक्ती होत्या या कथनापासून ते थेट नक्षलवादी कारवायांना पाठिंबा देताहेत या कथनापर्यंत, याउप्पर तर शेवटी अगदी अलीकडच्या कथनापर्यंत – की ते 'राजीव गांधी स्टाईलने' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्याकांडाच्या योजनेत सामील आहेत. या खोट्यानाट्या कथनांचे कोलित पोलिसांच्या हाती असल्याने कठोर युएपीए लागू करणे त्यांच्यासाठी अत्यंत सोयीचे होऊन जाते, मात्र या कायद्याअंतर्गत अडकलेली एखादी व्यक्ती कुठल्याही प्रकारच्या बचावात्मक उपायांशिवाय उरते आणि तिला कित्येक वर्षांसाठी तुरुंगवासाची शिक्षाही होऊ शकते.

मुळातच, या धाडसत्रांचा वापर पीडितांची इलेक्ट्रॉनिक साधने ताब्यात घेण्यासाठी केला गेला, म्हणजे नंतर त्यांचा गैरवापर करून हवे असलेले दावे सिद्ध करण्यासाठी पोलीस मोकळे. धाडीची पद्धत खूपच चमत्कारिक होती. धाड टाकणारे पोलीस आपल्यासोबत पुण्यातूनच दोन साक्षीदार घेऊन दिल्ली, नागपूर आणि मुंबई यांसारख्या दूर अंतरावरील ठिकाणी जात होते, ही खरंतर या कार्यवाहीची चेष्टा करण्याचाच प्रकार होता. ते आरोपींना घरातील एका खोलीत थांबवून ठेवत आणि जप्त केलेले साहित्य दुसऱ्या खोलीत सील करण्यासाठी घेऊन जात. वरनॉन गोन्साल्विस यांना अटक करण्यासाठी त्यांच्या घरावर टाकलेल्या धाडीची साक्षीदार असलेली त्यांची पत्नी सुसान अब्राहम जी स्वतः एक वकील आहे, तिने या धाडप्रक्रियेचे वर्णन करताना सांगितले की पोलिसांनी त्यांच्यासोबत त्यांचे स्वत:चे संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक साधने आणली होती. जप्तीची पूर्ण प्रक्रिया बिनधोक (फुलप्रूफ) असल्याचे सांगताना आणि न्यायाधीशही त्यावर विश्वास ठेवून ते स्वीकारताना यामागील पोलिसांद्वारे केला जाणारा एकमात्र दावा म्हणजे त्या संपूर्ण धाडप्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे. न्यायाधीशांनी हे समजून घेण्याची तसदीही घेतलेली नव्हती की इलेक्ट्रॉनिक साधनांमध्ये दुरूनही बदल केले जाऊ शकतात आणि थोड्याच सेकंदांमध्ये कितीतरी फाईल्स प्रसारित केल्या जाऊ शकतात. इलेक्ट्रॉनिक साधनांची सत्यता सिद्ध करण्यासाठी व्हिडिओ म्हणजेच अचूक पद्धत असे अजिबातच होऊ शकत नाही. मी स्वतः माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ असल्याने हे फसवं असल्याचे सिद्ध करून दाखवू शकतो. संगणक साधनांच्या प्रामाणिकतेची/सत्यतेची हमी केवळ विशिष्ट अल्गोरिदमने व्युत्पन्न केलेल्या हॅश व्हॅल्यूनेच देता येते आणि जोपर्यंत या दोन्हींना पीडितांद्वारे मान्यता दिली जात नाही तोपर्यंत त्यांच्यावर अजिबातच भरवसा ठेवता येत नाही. तपासासाठी कित्येक वर्षांचा कालावधी लागू शकतो हे पुरते जाणून असूनही न्यायालय याबाबत आंधळी दृष्टी स्वीकारून हे तपासाचे प्रकरण आहे असं

म्हणू शकते, पण ती पूर्ण होईपर्यंत मात्र निष्पाप व्यक्ती आणि तिचे कुटुंब पूर्णत: देशोधडीला लागलेले असते.

पोलिसांनी अटक केलेल्या एका कार्यकर्त्याच्या संगणकातून त्याला माओवाद्यांनी विशेष उद्देशाने लिहिलेली पत्रं (मेल न केलेली – कारण मेल नाकारता येत नाहीत) मिळाल्याचा दावा करायला सुरुवात केली. पोलिसांद्वारे सादर केलेली ही पत्रं खूपच चमत्कारिक होती कारण त्यात चक्क लोकांच्या खऱ्या नावांचा, त्यांच्या खऱ्या दूरध्वनी क्रमांकाचा वगैरे स्पष्ट उल्लेख करून संवाद साधला गेला होता. या पत्रांतील मजकूर लिहिण्याच्या पद्धतीवरून कोणालाही हे लगेच समजू शकेल की ही पोलिसांद्वारे तयार केलेली शुद्ध बनावटी पत्रं आहेत. असे आहे का की, माओवादी एक सरकारी संघटना चालवताहेत जी त्यांच्या योजनांबाबत सविस्तरपणे संवाद साधते आणि त्यांच्या प्रेषिताने हे संदेश पुढेमागे लेखापरीक्षणासाठी जपून ठेवावेत अशी अपेक्षाही बाळगते! खरंतर ते त्यांच्या उच्चतम कोटीच्या गुप्ततेसाठी, संदेशाची देवाणघेवाण करण्यासाठी मानवी संदेशवाहकांचे जाळे वापरण्यासाठी आणि संदेश वाचून झाल्यानंतर त्यांची तातडीने विल्हेवाट लावण्यासाठी ओळखले जातात. अशा संघटनेने आपल्या कार्यकर्त्यांशी निबंधावजा पत्रांद्वारे संवाद साधणे, ही खरंच अशक्य कोटीतील गोष्ट आहे. सार्वजनिक विचारक्षेत्रातील अनेक लोकांनी या पत्रांचे विश्लेषण करून ती खोटी व बनावट असल्याचे सिद्ध केले आहे. अशा संघटनांचा अभ्यास करत असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ कॉन्फ्लिक्ट मॅनेजमेंटचे कार्यकारी संचालक अजय साहनी यांच्यासारख्या तज्ज्ञांनीही ती पत्रे खोटी म्हणून निकालात काढली आहेत. अगदी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रचूड, हे एकमेव असे न्यायाधीश होते ज्यांनी पोलीस खटल्याच्या गुणवत्तेवर शंका घेतली, आणि त्यांच्या अल्पसंख्याक निवाड्यात ह्या पत्रांना सदोष ठरवले आणि रोमिला थापर आणि इतर जनवादी विचारवंतांच्या विनंतीनुसार एसआयटीद्वारे या संपूर्ण खटल्याचा तपास करण्याची शिफारस केली. पण कायद्याची ही विचित्र प्रक्रिया या सर्व विरोधी पुराव्यांपुढे अजिबातच नमतं घेत नाही आणि तथाकथित कायदा प्रक्रियेच्या – जी खुद्द एक भयानक शिक्षा आहे – वेदीवर निष्पाप लोकांचे बळी चढवायला सज्ज होते.

या पत्रांमध्ये राहुल गांधी, प्रकाश आंबेडकर, दिग्विजय सिंग यांसारख्या व्यक्तिमत्त्वांचीही नावे आहेत, ज्यांना माओवाद्यांच्या योजनेत साथीदार असल्याचे दर्शवले जात आहे. या नेत्यांची अपकीर्ती पसरवण्याचा स्पष्ट राजकीय हेतू यावरून उघड होतो. पोलिसांनी या राजकीय व्यक्तींकडून सत्य जाणून घेण्याचा साधा प्रयत्नही केलेला नाही आणि न्यायालयानेही याविषयी त्यांना का म्हणून प्रश्न विचारलेला नाही, ही खूपच विचित्र बाब आहे.

**माझ्यावर केलेले चमत्कारिक आरोप**

इतर सहा कार्यकर्त्यांसह, ज्यांपैकी पाच जणांना २८ ऑगस्ट २०१८ रोजी अटक केली गेली, माझ्या घरावरही पुणे पोलिसांनी धाड टाकली होती. त्यांनी रखवालदाराकडून डुप्लिकेट चावी मागवली आणि आमच्या अनुपस्थितीत विनावॉरंट आमचे घर उघडले. पंचनाम्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांनी घराच्या अंतर्भागाचे व्हिडिओ चित्रीकरण केले आणि घर पुन्हा बंद केले. आम्ही तेव्हा मुंबईत होतो. पोलीस आमचे घर उघडून झडती घेत असल्याचे दृश्य टीव्हीवर पाहून माझी पत्नी लगेचच्या विमानाने गोव्याला रवाना झाली आणि तिने बिचोलीम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आणि पोलिसांना अधिकची काही चौकशी करावीशी वाटल्यास आमचे दूरध्वनी क्रमांकही दिले. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी अतिरिक्त महासंचालक पोलीस परमजीत सिंग यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली आणि इतरांसह, माझा सहभाग असल्याच्या दाव्याच्या समर्थनार्थ एक पत्र सादर केलं. ते पत्र कोणा माओवादी कॉम्रेड आनंदला लिहिल्याचे म्हटले गेले

होते ज्यात एप्रिल २०१८मध्ये झालेल्या पॅरिस कॉन्फरन्सचा उल्लेख होता. तशी कॉन्फरन्स झाली होती हे खरे आहे. अमेरिकन युनिव्हर्सिटी ऑफ पॅरिसद्वारे आयोजित त्या अकादमिक कॉन्फरन्सला जगभरातील इतर अनेक विद्वज्जनांसोबत मीसुद्धा उपस्थित होतो. त्यांनी पत्रकार परिषदेत खूपच हास्यास्पद बाब सूचित केली होती, ती अशी की या कॉन्फरन्ससाठी त्या युनिव्हर्सिटीला माओवाद्यांनी पैसे पुरवले होते आणि वर कडी म्हणजे त्यांना मला आमंत्रित करायलाही सांगितले होते. त्यात असेही सूचित केले होते की त्यांनी 'कॉम्रेड इटीने बालिबर' (प्रा. बालिबर हे एक अत्यंत आदरणीय फ्रेंच मार्क्सवादी विद्वान आहेत) यांच्याशी बोलून त्यांना माझी मुलाखत घ्यायची व्यवस्थाही लावून दिली होती. आणि 'कॉम्रेड अनुपमा राव आणि कॉम्रेड शैलजा पैक' (दोघी अनुक्रमे बर्नार्ड कॉलेज आणि सीनसिनाटी युनिव्हर्सिटीमध्ये प्राध्यापिका आहेत) यांना त्यांनी अतिथी व्याख्याता म्हणून मला त्यांच्या विद्यापीठामध्ये आमंत्रित करण्याविषयीही सांगून ठेवले होते. ते पत्र मी एनडीटीव्हीमधून मिळवले आणि प्रा. बालिबर यांना आणि त्या कॉन्फरन्सचे आयोजक, प्रा. लिसा लिंकन  यांना मेलने पाठवले. ते अशा स्वरूपाची अफवा पाहून स्तब्धच झाले आणि त्यांनी मला प्रत्युत्तर लिहिले. प्रा. बालिबर यांनी संतापाने भरलेले निषेधाचे पत्र पाठवले आणि तसे फ्रेंच दूतावासालाही लिहिले. प्रा. लिंकन यांनी सविस्तर नमूद केले की कसे त्यांच्या युनिव्हर्सिटीनेच मला आमंत्रित केले होते आणि माझ्या उपस्थितीचा संपूर्ण खर्चही केला होता. या विश्वसनीय पुराव्यांच्या बळावर मी परमजीत सिंग यांच्यावर माझी बदनामी केली म्हणून फौजदारी खटला नोंदविण्याचे ठरवले आणि ५ सप्टेंबर २०१८रोजी महाराष्ट्र सरकारला कार्यपद्धतीनुसार परवानगी मागणारे पत्रही  लिहिले मात्र आजही त्या पत्राला काहीही प्रतिसाद मिळालेला नाही.

दरम्यानच्या काळात, माझ्याविरोधात वरवर पाहाता कोणताही खटला नव्हता आणि महाराष्ट्र सरकारला माझ्या पत्राने कदाचित त्यांच्या दोषांची जाणीव झाली असेल असे वाटून, मी माझ्याविरोधात दाखल केलेली एफआयआर रद्दबातल ठरवण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचे ठरवले. खंडपीठाने यथायोग्यपणे पोलिसांना माझ्याविरोधात त्यांच्याकडे असलेल्या सर्व आरोपांची यादी असलेले प्रतिज्ञापत्र (ॲफिडेविट) सादर करण्यास सांगितले. पोलिसांनी पाच आरोपांची म्हणजेच वर आधीच चर्चा केलेल्या पत्रासह पाच पत्रांची यादी असलेले प्रतिज्ञापत्र (ॲफिडेविट) न्यायालयासमोर सादर केले. माझ्या प्रत्युत्तरात, आम्ही त्यांचे सर्व वादाचे मुद्दे खोडले होते आणि ती पत्रं खरी आहेत असे समजून चालू तरीदेखील त्यावरून कुठलाही गंभीर खटला उभा राहत नाही, हेही सिद्ध करून दाखवले होते. त्या इतर चार पत्रांपैकी:

पहिले पत्र कोणीतरी कोणालातरी लिहिलेले होते ज्यात सूचित केल्याप्रमाणे कोणी आनंदनामक व्यक्ती २०१५मध्ये आयआयटी मद्रास प्रशासनाने मान्यता काढून घेतल्यानंतर प्रसिद्धीझोतात आलेले आंबेडकर पेरियार स्टडी सर्कल (एपीएससी) आयोजित करण्याची जबाबदारी घेणार होता. त्या वेळी मी मद्रासपासून २००० किमी दूर अंतरावर असलेल्या आयआयटी, खरगपूरच्या बिझिनेस स्कूलमध्ये प्राध्यापक होतो. मला विद्यार्थी संघटित करायचेच होते असे जर तात्पुरते मानले तर ते मी माझ्याच खरगपूर आयआयटीत केले असते ना; त्यासाठी २०००किमी दूर अंतरावर असलेल्या मद्रास आयआयटीमध्ये जाण्याची मला काय गरज पडली असती? पण तरीही, एपीएससीच्या संस्थापक सदस्यांना जेव्हा ही बातमी वर्तमानपत्रांतून समजली, तेव्हा त्यांनी त्यांना माहिती देण्यात अथवा त्यांच्या कुठल्याही उपक्रमात माझा दूरान्वयेही संबंध नसल्याचा निर्वाळा देणारे पत्र मला पाठवले.

पुन्हा कोणीतरी कुणालातरी लिहिलेल्या आणि कोणा आनंदचा संदर्भ असलेल्या दुसऱ्या पत्रात, आनंदने

अनुराधा गांधी मेमोरियल कमिटी (एजीएमसी)च्या बैठकीत 'उत्तम सल्ला' दिल्याचा उल्लेख होता. असो, त्या आनंदचे जरी माझ्याशी साम्य निघाले तरी, इतर अनेक आदरणीय सदस्यांसह मीसुद्धा या ट्रस्टचा एक सदस्य आहे, जी दशकभरापूर्वीपासून नोंदणीकृत असलेली संघटना असून तिचे पॅन, बँक खाते आणि आदरणीय व्यक्ती सदस्य म्हणून आहेत. त्यावेळी समीर अमीन आणि एंजेला डेव्हिस यांसारखे ख्यातनाम विद्वान जाहीर व्याख्याने देण्यासाठी आले होते आणि याचे विस्तृत कव्हरेजही त्या वेळच्या वृत्तपत्रांनी केले होते. ट्रस्ट किंवा कमिटीमध्ये मी सदस्य असूनही खरं तर मी एक किंवा दोन अपवाद वगळता मागच्या दहा वर्षांमध्ये कधी त्यांच्या बैठकींना अथवा व्याख्यानांना उपस्थित राहू शकलेलो नाहीये.

पुन्हा कोणीतरी कुणालातरी लिहिलेल्या आणि कोणा आनंदचा संदर्भ असलेल्या तिसऱ्या पत्रात, आनंदने गडचिरोली एन्काऊंटरचे सत्यशोधन तडीस नेण्यासाठी आयोजन करण्याची जबाबदारी घेतली होती. या पत्रातला आनंद मी आहे असं तात्पुरते समजल्यास, मी कमिटी फॉर प्रोटेक्शन ऑफ डेमोक्रॅटिक राईट्स (सीपीडीआर)चा सरचिटणीस आहे, ज्याची जबाबदारी मानवी हक्क उल्लंघनांच्या संशयास्पद प्रकरणांचे सत्यशोधन करणे ही आहे. तरीही, सत्य हे आहे की मी अशी कुठलीही कमिटी आयोजित केली नव्हती आणि त्यात कधी सहभागीही झालो नव्हतो. खरं तर, मी सुरुवातीला सरचिटणीस झालो ते माजी सरचिटणीस पी. ए. सेबॅस्टिअन यांच्या इच्छेचा मान ठेवून, आणि नंतर कित्येक वर्षांपासून महाराष्ट्रापासून दूर राहूनही केवळ सदस्यांच्या आग्रहाखातर या पदावर मी कायम राहिलो.

चौथा आरोप म्हणजे कोणाच्यातरी संगणकामधून मिळालेली एक खरडलेली टीप असून : त्यावर 'आनंद टी ... ९०टी सुरेंद्र (मार्फत मिलिंद)' लिहिलेले आहे. याचा असा अर्थ लावला जातोय की मला सुरेंद्रच्या वतीने मिलिंदमार्फत ९०,०००/- देण्यात आले. मी पैसे घेतले असा अर्थ काढणे म्हणजे हास्यास्पद आणि अत्यंत वाईट कल्पनाशक्तीचा परिपाक आहे, मी स्वतः इतके पैसे तर दर महिन्याला इन्कम टॅक्सच्या रूपात अनेक वर्षांपासून भरतो आहे. खरंतर, अशा प्रकारचा खरडलेला टिपकागद कायद्यासमोर पुरावा म्हणून ग्राह्यच धरला जात नाही.

पोलीस प्रतिज्ञापत्राला मी दिलेल्या प्रत्युत्तरात (रिजॉइण्डर) अशाप्रकारे सर्व आरोप खोडून काढण्यात आले आहेत. पण शेवटी मात्र पोलिसांनी एक 'सील्ड' पाकीट न्यायाधीशांसमोर सादर केलं, आणि माझ्या वरील कुठल्याही नकार-मुद्द्यांचा किंवा माझ्या वैयक्तिक श्रेय-उपलब्धींचा आणि पोलिसांनी माझ्यावर केलेल्या आरोपांचे दावे माझ्या निष्कलंक चरित्राच्या आसपास तरी फिरकण्याच्या लायकीचे आहेत का याचा कसलाच संदर्भ लक्षात न घेता न्यायालयाने माझी याचिका फेटाळून लावली.

माझी बाजू सबळ आहे असं वाटून, मी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली पण त्यांनी या टप्प्यावर पोलीस छाननीत हस्तक्षेप करणार नाही अशी भूमिका घेतली आणि मला सक्षम न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मिळवण्याचा सल्ला देण्यात आला.

खटल्याचा निर्णायक क्षण आता येऊन ठेपला आहे जिथे माझ्या सर्व साधारण समजुती धुळीस मिळाल्या आहेत आणि मी अटक संकटाच्या संभाव्यतेने उद्ध्वस्त झालो आहे. तुरुंगामध्ये असलेले माझे इतर नऊ सह-आरोपी आधीच कायदेशीर प्रक्रियेची छळवणूक सोसत आहेत. माझ्याप्रमाणे त्यांच्याजवळ तुमच्याकडून मदत मिळवण्याची संधी नाहीये. ऐक्य दाखवण्यासाठी तुम्ही माझ्यासोबत उभं राहण्याने मला आणि माझ्या कुटुंबाला हा जुलूम सोसण्याचे बळ मिळणार आहे इतकेच केवळ नाही तर यामुळे फॅसिस्ट सत्ताधाऱ्यांनाही हे कळून चुकणार आहे की भारतात असेही लोक आहेत जे त्यांना निर्धाराने 'नाही' म्हणू शकतात.

●

# मला माहीत असलेले आनंद तेलतुंबडे

सी. राममनोहर रेड्डी

अत्यंत सैल आणि बेजबाबदारपणे केलेल्या आरोपालाच कायदेशीर गुन्ह्याचा दर्जा मिळण्याच्या आजच्या काळात युएपीए कायद्याच्या वेदीवर आणखी एक बळी चढवला जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. हा बळी आहे डॉ. आनंद तेलतुंबडे. ख्यातनाम दलित बुद्धिजीवी व बहुआयामी व्यक्तिमत्व ही त्यांची ओळख आहे.

खरं तर आपुलकीचा भाव असलेला कुठलाही समाज तेलतुंबडेंसारख्या व्यक्तीचे संरक्षण करायला उभा राहील : तसे न होता त्यांना भीमा कोरेगाव या खुळचट खटल्यात गोवून त्या भयानक कायद्याखाली अनेक वर्षे तुरुंगात डांबण्याची धमकी देण्यात येत आहे.

सन २००५मध्ये मुंबईला प्रख्यात इतिहासकार रोमिला थापर यांचे एक भाषण होते. त्या प्रसंगी चाळिशीतल्या एका विनयशील माणसाने मला त्याचे बिझनेस कार्ड दिले – त्यावर नाव होते : आनंद तेलतुंबडे, मॅनेजिंग डायरेक्टर, पेट्रोनेट. त्या काळात मुंबईचे बुद्धिजीवी विश्व माझ्याकरिता नवे होते. आदल्याच वर्षी मी इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचा (EPW) संपादक झालो होतो. मला आनंद तेलतुंबडे माहीत नव्हते. म्हणूनच एका सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेचा प्रमुख अधिकारी इतिहास–तंत्रावरील भाषणाला हजर राहतो आहे, हे पाहून मी काहीसा बुचकळ्यात पडलो.

तथापि मला लवकरच उमगले की तेलतुंबडे एका पीएसयूचे प्रमुख असण्याच्या व्यतिरिक्त बरेच काही होते. आयआयएम, अहमदाबादचा हा पदवीधर विपुल राजकीय लिखाण करीत होता– वृत्तपत्र व मासिकांसाठी लेख लिहीत होता. अनेक पुस्तकेही त्याने लिहिली होती. त्याच्या चाकोरीबाह्य दृष्टिकोनांमुळे कोणत्याही विषयाचे अंतरंग तो आपल्या लिखाणाद्वारे उलगडून दाखवू शकत होता. तेलतुंबडे यांना शिक्षण क्षेत्रातही रुची होती. त्यामुळेच पुढे त्यांनी व्यवस्थापकीय नोकरी सोडून देऊन त्यांनी पहिल्यांदा आयआयटी, खरगपूर येथे, आणि त्यानंतर गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये शिक्षकाचे काम स्वीकारले होते.

एक दशकाहून जास्त काळ मला तेलतुंबडेंचे लिखाण आधी वाचण्याचा आणि तदनंतर एझथमध्ये प्रकाशित करण्याचा बहुमान मला प्राप्त झाला. २०१० साली एझथने तेलतुंबडेंना चालू घडामोडींवर मासिक स्तंभलेखन करण्याची विनंती केली. मी चुकत नसेल तर

लेखक हैदराबादस्थित असून फेब्रुवारीमध्ये सुरू होणाऱ्या The India Forum या ऑन–लाईन मासिकाचे संपादक आहेत.

ट्वीटर – @ramreddy

एका दलित लेखकाने इंग्रजी भाषेतील प्रकाशनात आपला स्तंभ चालवण्याची ही पहिलीच वेळ होती. 'मार्जिन स्पीक' हा स्तंभ कमालीचा यशस्वी झाला. दलित प्रश्नांहूनही कितीतरी व्यापक असा या स्तंभाचा विस्तार होता. राजकारणातला किंवा समाजातला असा एकही विषय नसेल ज्याच्यावर तेलतुंबडे यांनी भाष्य केले नसेल. बहुतेक स्तंभलेखक असे असतात की काही कालावधीनंतर तुम्ही त्यांची मते काय असतील याबद्दल अनुमान करू शकता. पण हा स्तंभलेखक असा होता की जो वारंवार तुमच्यापुढे असाधारण दृष्टिकोन ठेवीत राहिला. ज्यांचे खुद्द बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवाराशी विवाहामुळे संबंध आहेत असे हे आनंद तेलतुंबडे अनेकदा दलित कार्यकर्त्यांना न रुचणारी मते व्यक्त करीत. तरीही, एझथ च्या स्तंभांपैकी तेलतुंबडेंचा स्तंभ सर्वात अधिक वाचला जायचा आणि पुष्कळदा तो इतरत्रही प्रसिद्ध केला जायचा.

तेलतुंबडेंची लेखणी टोकदार आहे परंतु त्यांचा अविर्भाव सहजासहजी डोळ्यात भरेल असा अजिबात नाही. २०१०च्या दशकाच्या सुरुवातीला मी त्यांच्यासह एका नागरिक-समितीचा सदस्य होतो. मंगलोर रिफायनरीज अँड पेट्रोकेमिकल्स लि.च्या एका मोठ्या प्रकल्पामुळे झालेल्या विस्थापितांच्या समस्येबाबत ही समिती सुनवाई करत होती. दोन दिवसांच्या भेटीत तेलतुंबडे यांनी कायद्याचा होत असलेला दुरुपयोग तत्परतेने अधोरेखित केला, तसेच (विस्थापितांबद्दल) समरसता व सहानुभूती दर्शवली. परंतु स्वतःला प्रकाशझोतात आणण्याचा एकदाही प्रयत्न केला नाही. सन २०१३मध्ये वेगळ्याच एका परिसरात म्हणजे सिक्कीमच्या केंद्रीय विद्यापीठाच्या एका परिषदेत त्यांच्यासह मीही भाग घेतला. तेव्हा त्यांनी एक अत्यंत उद्बोधक निबंध सादर केला.

असे हे तेलतुंबडे भीमा कोरेगाव मंचाचा वापर करून हिंसाचार लादण्याचे कट-कारस्थान करतील असा विचार करणेदेखील मूर्खपणा आहे. वास्तविक, त्यांच्या स्वतःच्या दृष्टिकोनानुसार, १८१८ची भीमा कोरेगावची लढाई फारशी महत्त्वाची नाही. २०१८च्या सुरुवातीला 'द वायर'मध्ये लिहिलेल्या एका लेखात तेलतुंबडे यांनी म्हटले आहे की आंबेडकरांसाठी, त्यांच्या काळात, ही लढाई म्हणजे महारांनी ब्रिटिश नेतृत्वाखाली ब्राह्मणी जुलूम-कर्त्यांविरुद्ध दिलेला लढा होता, असे दर्शवणे महत्वाचे होते. पण असे म्हणणे म्हणजे शुद्ध मिथक आहे. याचे कारण म्हणजे ऐतिहासिकदृष्ट्या त्या लढाईला 'जुलुमाचे बळी विरुद्ध जुलूमशाह' अशी लढाई म्हणणेच चुकीचे आहे. या पुराण  कथेला असलेले राजकीय उद्दिष्ट केव्हाच नाहीसे झाले आहे. एकविसाव्या शतकात या पुराण कथेला चिकटून राहण्याचे पर्यवसान दलितांनी अस्मिताजन्य दलदलीत रुतण्यात झाले आहे, असा तेलतुंबडे यांचा युक्तिवाद आहे.

अशी विरोधी व ठाम मते बाळगणारा माणूस भीमा कोरेगाव वार्षिक दिनाचा वापर राज्याविरुद्ध कटकारस्थान रचण्यासाठी करेल- हे अविश्वसनीय आहे.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या कारवाईचा आता एक परिचित आकृतिबंध आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांविरोधात देशद्रोहाचे आरोप करण्यापासून तर नॅशनल सिक्युरिटी ॲक्ट खाली तथाकथित गो-तस्करांना आरोपी करण्यापासून ते UAPAच्या अंतर्गत बुद्धिजीवी आणि कार्यकर्त्यांच्या विरोधात आरोप तयार करेपर्यंत- हे सगळे सत्ताधारी व्यवस्थेच्या फायद्यासाठी राजकीय उद्दिष्टांने होताना दिसते आहे. आरोप ठेवलेले अंतिमतः दोषमुक्त ठरवले जातील, पण अंतिमतः म्हणजे जीवनात हरपलेल्या अनेक वर्षांनंतर. बनावट आरोपांच्या आधारावर नागरिकांना तोफेच्या तोंडी देणे हे सभ्य समाजाने होऊ द्यावे का?

●

(दि. १८ जानेवारी २०१९च्या इंडियन एक्सप्रेसमधील लेखाचा मराठी अनुवाद **सुकुमार शिदोरे** यांनी केला आहे.)

# तेलतुंबडे यांच्यावरील गुन्हा त्वरीत मागे घ्यावा

उदय नारकर

प्रा. डॉ. आनंद तेलतुंबडे हे जागतिक मान्यताप्राप्त विचारवंत आहेत. त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विचार त्यांच्या लेखन-भाषणातून सर्वश्रुत झालेले आहेत. त्यांचे विचार भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाच्या मूल्यांचे, त्यातील लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष तत्त्वांचे आविष्करणच नव्हे तर परिपोषण करणारे आहेत. अशा विचारवंत लेखकावर पोलिसांनी भीमा-कोरेगाव प्रकरणी खोट्या आरोपावरून गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांचे हे कृत्य हेतुपुरस्सर आणि कारस्थानी स्वरूपाचे असल्याने त्यांच्यावरील गुन्हा त्वरीत मागे घ्यावा, अशी मागणी आम्ही करत आहोत.

भीमा-कोरेगाव प्रकरणी उसळलेल्या हिंसाचाराशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे त्यांनी जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे. त्यांनी दिलेल्या वृत्तांतावरून त्यांचा त्या हिंसाचाराशी दूरान्वयानेही संबंध नसल्याचे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ दिसते. उलट त्यांनी भीमा कोरेगाव लढाईच्या २००व्या स्मृतिदिनानिमित्त लिहिलेल्या लेखात ब्रिटिश फोजेतील महार सैनिकांच्या शौर्याचा गौरव करत असताना ती लढाई शोषक आणि शोषितांच्या दरम्यान झाल्याची मांडणी खोडून काढली आहे. ३१ डिसेंबर २०१७च्या पुण्यातील एल्गार परिषदेच्या संयोजनामागील वैचारिक बैठकीविषयी आपले मतभेद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. वैचारिक मतभेद स्पष्ट झाल्यानंतर त्यांनी त्या परिषदेपासून अलग रहाणे पसंत केले. या सर्व गोष्टींचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहेत. असे असतानाही पोलिसांनी त्यांच्यावर दाखल केलेला गुन्हा हा अन्याय्य असून कायद्याची पायमल्ली करणारा आहे. भीमा-कोरेगाव प्रकरणी मनोहर भिडे आणि मिलिंद एकबोटे यांच्यावर काहीही कारवाई न करता अनेक लोकांचा बादरायण संबंध जोडून त्यांना युएपीए (बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधन) कायदा) हा कायदा लावला आहे. ही पार्श्वभूमी पहाता तेलतुंबडे यांच्यावरदेखील पोलीस याच कायद्यानुसार कारवाई करण्याची दाट शक्यता दिसते. डॉ. तेलतुंबडे यांचे विचार देशातील प्रस्थापित राजवटीचे समर्थन करणारे नसल्याने त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा राजकीय डाव असल्याचे दिसते. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या महाराष्ट्र पोलिसांच्या ब्रीदवाक्याला काळिमा फासणारे हे कृत्य आहे.

अलिकडील काळात महाराष्ट्र पोलीस कर्तव्यकठोर होण्यापासून

लेखक कोल्हापूर येथे राहात असून डाव्या चळवळीतील लेखक - कार्यकर्ते आहेत.
ईमेल - udaynarkar@gmail.com

परावृत्त होत असल्याचे दिसते. डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांच्या तपासावर वारंवार ताशेरे ओढले आहेत. केवळ कर्नाटक पोलिसांच्या तपासावर अवलंबून न रहाता स्वयंप्रज्ञेने तपास करण्याविषयी कानउघाडणी उच्च न्यायालयाने केली आहे. त्या हत्यांमागील अपराध्यांना मोकळे सोडून डॉ. तेलतुंबडे यांच्यासारख्या निरपराध नागरिकास पोलीस का त्रास देत आहेत, हे सुबुद्ध नागरिकांस समजण्यापलिकडचे आहे. प्रस्थापित सरकार चालवणारी राजकीय विचारसरणी मान्य नसणाऱ्या व्यक्ती, संघटनांच्या मनात दहशत बसवण्यासाठी पोलीस यंत्रणेचा वापर होऊ देता कामा नये. अशा कृत्यांतून पोलीस यंत्रणा फॅसिस्ट कार्यपद्धतीच्या आहारी जाईल. इटलीतील मुसोलिनीच्या फॅसिस्ट प्रशासनाने अंतोनियो ग्राम्सी या विचारवंतास 'किमान वीस वर्षे त्याचा मेंदू काम करायचा थांबेल, अशी शिक्षा करावी', अशी मागणी तेथील न्यायासनासमोर केली होती. या दुष्ट नीतीला महाराष्ट्र पोलीस बळी पडत नाहीत ना, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, धर्मनिपेक्षता या मूल्यांवर निर्भेळ आस्था असणाऱ्या आनंद तेलतुंबडे यांना भयमुक्त वातावरणात आपले वैचारिक कार्य करण्यापासून आपण वंचित करू नये, त्यासाठी त्यांच्यावर घालण्यात आलेला खोटा गुन्हा मागे घ्यावा, असे आवाहन आम्ही करत आहोत.

एक मानुष, सुसंस्कृत समाज घडवण्यासाठी जॉर्ज वॉशिंग्टन यांनी सांगितलेल्या विचाराची आपण जोपासना केली पाहिजे. ते म्हणाले होते:

"If freedom of speech is taken away, then dumb and silent, we may be led, like sheep to the slaughter."

●


परिवर्तनाचा
वाटसरू

**परिवर्तनाचा वाटसरूची वर्गणी**
**बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील**

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

**पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७७७६९०२२६७ या क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा pwatsaru@yahoo.com या ईमेलवर कळवावे.**

**अस्वातंत्र्याचं वास्तव**

*"आपण कधी प्राण्यांना धर्म आणि जादू-टोण्याच्या मूर्ख आणि प्रसंगी भयावह वेडेपणाच्या नादी लागताना बघत नाही... केवळ मनुष्यच अशा प्रकारे अतार्किक मूर्खपणाने वागताना दिसतो."*

-अल्डस हक्सले

# दाभोलकरांचाही गांधी केला

आनंद तेलतुंबडे

महाराष्ट्राने आपल्या निर्लज्जपणाच्या ऐतिहासिक संचितात अजून एका शरमेची भर टाकली आहे. फुले-आंबेडकरांचा वारसा सांगून-सांगून स्वत:ला पुरोगामी संबोधण्यात न थकणाऱ्या महाराष्ट्राने अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधाचे एक मूर्तिमंत उदाहरण म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर या निष्ठावान बुद्धिवाद्याची दि. २० ऑगस्टला हत्या केली आहे. ह्या पुरोगामित्वाच्या दाव्याला तडा देणाऱ्या असंख्य वस्तुनिष्ठ तथ्यांकडे तो सोयीस्करपणे दुर्लक्ष करतो. संतपरंपरेचा वारसा सांगणाऱ्या याच महाराष्ट्राने ज्ञानेश्वरासह त्याच्या सर्व भावंडांना वाळित टाकले आहे, तुकारामाच्या क्रांतिकारी आवाजाला दाबून टाकण्यासाठी त्यांना जिवे मारले आहे व निर्लज्जपणे ते वैकुंठास गेल्याची थाप रुजविली आहे. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करू न देणारा, शाहू छत्रपतींना धमक्या देणारा महाराष्ट्रही हाच. ह्याच महाराष्ट्राने सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांची निंदा-नालस्ती केली; राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा, समरसता मंच यांसारख्या असंख्य विषाक्त संघटनांना जन्माला घातले, देशाला अतिरेकी प्रतिक्रियावादींचे सर्वाधिक योगदान केले, ज्याचा कळस नथुराम गोडसेच्या रूपात गांधीहत्येने गाठला गेला. हा प्रवाह महाराष्ट्रातीलच अभिनव भारतने अलीकडेच घडवलेल्या दहशतवादी कृत्यांच्या स्वरूपात एकविसाव्या शतकात पुनरुज्जीवित केला आहे. दलितांच्या गळ्यात मडके आणि कंबरेला झाडू बांधणाऱ्या इतिहासातील अनन्य ब्राह्मणी सत्तेला साकार करणारे हेच राज्य आहे. दलित अत्याचाराच्या घटनेत उल्लेखनीय संख्यात्मक भर घालत खैरलांजीसारखे उदाहरण प्रस्थापित करणारेही हेच राज्य आहे. त्याच्या या खोलवर रुतलेल्या प्रतिक्रियावादी चारित्र्यामुळेच फुले आणि आंबेडकरांना इथे जन्म घ्यावा लागला याची पुसटशी कल्पनाही त्याला स्पर्श करत नाही. ही अत्यंत शरमेची बाब आहे की एका बाजूला ते या महापुरुषांना आपले आदर्श म्हणून मिरवते आणि दुसऱ्याच बाजूला आपली प्रतिक्रियावादी वृत्ती जोपासत दाभोलकरांसारख्या आपल्याच अपत्यांची हत्या करत जाते.

आपली हत्या करण्याइतपत एखाद्याला प्रवृत्त करतील असे व्यक्तिमत्त्व

डॉ. नरेंद्र दाभोलकर हे खचितच नव्हते. एका दशकाहून थोडा अधिक काळ वैद्यकीय व्यवसायात घालवल्यानंतर त्यांनी स्वत:ला समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामी झोकून दिले. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली, ज्याचे ते संस्थापक-अध्यक्ष होते. आपण कोणत्याही श्रद्धेच्या विरोधात नाही तर श्रद्धेच्या नावावर चालणाऱ्या अंधश्रद्धेच्या विरोधात आहोत हे ते सदैव निक्षून सांगत असत. त्यांनी आपल्या विचार-प्रसरणासाठी अनेक पुस्तके लिहिली व महाराष्ट्राला सुपरिचित असणाऱ्या समाजवादी साने गुरुजींच्या साधना साप्ताहिकाचे संपादन केले. ते उदारमतवादी होते. विचार आणि कृतीमधील जहालपणा त्यांनी टाळला पण आपल्या ध्येयाबाबत मात्र ते अत्यंत पक्के होते. आपल्या सचोटीसाठी ओळखले जाणारे दाभोलकर लोकांना मार्गदर्शन करत सतत राज्यभर फिरत असत आणि एखाद्या मिशनऱ्याच्या उत्साहात तरुणांसाठी शिबिरे घेऊन त्यांना अंधश्रद्धेतील दुष्ट गोष्टींविषयी प्रशिक्षण देत असत. काळ्या/गूढ विद्येच्या नावाखाली लोकांना फसवणाऱ्या बुवा-बाबांच्या विरोधात कोणताही मुलाहिजा न ठेवता ते बोलत असत. या बुवा-बाबांपैकी बरेचजण जरी लोकांच्या छोट्या-मोठ्या भीकसदृश देणग्यांवर उदरनिर्वाह करणारे क्षुद्र कोटीत येत असले तरी मात्र आसारामबापू, निर्मलबाबा आणि त्यांच्यासारखे कित्येकजण आपला अफाट अनुयायी गण घेऊन संस्थानस्वरूप बनले आहेत. या धेंडांच्या कार्यक्रमाचे प्रसारण हे मिनिटाला करोडो रुपये चार्ज करणाऱ्या राष्ट्रीय वाहिन्यांवरून संपूर्ण देशभर होत असते. त्यांच्यामागे संघपरिवाराची वेबसाइट्स, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि बहुभाषिक प्रेस इ.नी सज्ज अशी बलाढ्य प्रचारयंत्रणा आणि डावपेचात्मकपणे बहुअंगी सुळ्यांसारख्या उभारलेल्या असंख्य हिंदू राष्ट्रवादी संस्था कार्यरत आहेत.

बेजोड बुद्धिप्रामाण्यवादी असलेले दाभोलकर हे जातीविरुद्ध होते. त्यांनी दलितांच्या समता आंदोलनात, त्यांच्याविरुद्ध भेदभाव प्रवृत्तीच्या व जाती अत्याचाराच्या निषेध चळवळीत व विशेषतः मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनात भाग घेतला होता. नुकत्याच नाशिक येथे घडलेल्या जातीअस्मितेसंबंधी खून घटनेच्या निषेधार्थ ते अत्यंत जोरकसपणे बाहेर आले होते. जातपंचायतीच्या दबावाखाली येऊन आंतरजातीय लग्नाचे कारण पुढे करून जोशी भटक्या जमातीच्या एका माणसाने आपल्याच नऊ महिने गरोदर असलेल्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक घटना तेथे घडली होती. जमातींचे जातीकरण करण्याची ही किमयासुद्धा संघ परिवाराच्या उपलब्धीचाच एक भाग आहे. जोशी समाजाच्याच अण्णा हिंगमिरे या व्यक्तीने ३ जुलै २०१३ ला पोलीस कमिश्नरला लिहिलेल्या पत्रावरून ही दुष्ट प्रथा उघडकीस आली. आपल्या मुलीने आंतरजातीय विवाह केल्यामुळे जातपंचायतीकडून होणाऱ्या पिळवणुकीच्या विरोधात त्यांनी तक्रार केली होती. ही हत्या आणि ती प्रकाशात आणणारा त्यापाठोपाठचा तपास जर झाला नसता तर एवढी वर्षे चालू असलेल्या या अमानवीय प्रथेसंबंधी कोणाला जराही सुगावा लागला नसता. हा विषय एखाद्या विशिष्ट जातीपुरता मर्यादित नाही. जातपंचायत ही प्रत्येक जातीमध्ये वेगवेगळ्या सत्तास्तरावर या न त्या स्वरूपात नेहमीच कार्यरत राहिल्या आहेत. परंतु जागतिकीकरणाच्या मागील दोन दशकांत त्यांनी निश्चितपणे पुन्हा उसळी घेतली आहे. हरियाणातील जाटभूमीत वा बिहार-उत्तर प्रदेशसारख्या हिंदी पट्ट्यातच नव्हे तर सर्वत्रच हा हिणकस प्रकार प्रखरपणे समोर येत आहे, तर फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रासह त्यांच्या विरोधात, इतर सर्व पुरोगामी लोकांमधून डॉ. दाभोलकरांचे त्वेषाने पुढे येणे हे एकप्रकारे स्वाभाविकच म्हणावे लागेल.

साहजिकच ते त्यांचा निशाणा बनले. हिंदू सनातन संस्था, शिवसेनेसारख्या आपल्या विस्तारीत अंगांसह संपूर्ण संघ परिवार आणि लोकांच्या भाबडेपणावर पोसले

जाणाऱ्या व्यक्ती आणि संस्था हे सर्वच त्यांच्या विरोधात होते. हिंदू सनातन संस्था ही या विषारी विरोधात सर्वात आघाडीवर होती. विविध भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या आपल्या सनातन प्रभात या मुखपत्रातून त्यांनी दाभोलकरांवर अत्यंत हिंसक भाषेतून टीकास्त्र चालवले होते. यापैकी एका लेखात दाभोलकरांचा फोटो छापून, ज्यावर लाल रंगाने क्रॉस केल्याची खूण केली होती; त्याचा जनमानसातील प्रचलित अर्थ वादातीत आहे; तो स्पष्टपणे त्यांना संपवण्याचा इशाराच होता. ह्यापेक्षा अधिक प्रत्यक्ष धमकी ती काय असू शकेल? दाभोलकरांविषयी त्यांच्या मनात असलेला द्वेष त्यांनी कधीच लपवून ठेवला नाही; अगदी त्यांच्या हत्येच्या पश्चातदेखील! दुसऱ्याच दिवशी म्हणजे २१ ऑगस्टच्या 'सनातन प्रभात'मध्ये सनातन संस्थेचे अध्यक्ष डॉ. आठवले लिहितात की, ''ही परमेश्वराचीच कृपा म्हणावी लागेल की त्यांना अशा पद्धतीने मृत्यू आला. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे ज्याचा जन्म होतो त्याचा मृत्यू हा निश्चितच असतो; जन्म आणि मृत्यू हे एखाद्याचे प्रारब्धच ठरवत असते. प्रत्येकाला त्याच्या कर्माची फळे ही मिळतच असतात. आजारपणाने खाटेवर झुरून किंवा ऑपरेशन/शस्त्रक्रियेनंतरच्या यातना सहन करत मरण्यापेक्षा दाभोलकरांना लाभलेला मृत्यू म्हणजे एकप्रकारे परमेश्वराने त्यांच्यावर केलेली कृपाच म्हणावी लागेल. मुंबईमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांच्या मृत्यूशी आपला कोणताही संबंध नाही असे सांगत असताना दाभोलकरांच्या मृत्यूविषयी कोणत्याही पद्धतीचा खेद त्यांनी व्यक्त केला नाही. याउलट दाभोलकरांप्रमाणेच लालभडक रंगाचे क्रॉस असलेले इतर अनेकांचे फोटो आम्ही प्रसिद्ध करत जाऊ असे या महाभागांनी जाहीर केले; म्हणजे प्रत्यक्षपणे आम्ही अजून दाभोलकरांचा मार्ग चालणाऱ्यांनादेखील असेच संपवू असा इशारा जाहीरपणे ते देत होते. याच आवृत्तीत सनातन संस्थेचे प्रतीक असलेला एक ताकदवान हत्ती आपल्या क्षुद्र विरोधकांकडे दुर्लक्ष करत पुढे चालत आहे असे एक चित्र सनातन प्रभातमध्ये छापले आहे. त्याखाली धर्मप्रिय सनातन्यांवर जे लोक दोषारोप करतात त्यांना थांबवण्याचे आवाहनसुद्धा आपल्या वाचकांना केले होते. अशा नाजूक प्रसंगीसुद्धा दुःसाहसाचे हे जाहीर प्रदर्शन त्यांना आपल्या सुरक्षिततेची हमीच प्रदर्शित करते.

डॉ. दाभोलकरांना विरोध करणारा दुसरा गट हा अशा लोकांचा होता, ज्यांनी लोकांच्या भोळसटपणाचा फायदा घेणे हा आपला धंदा बनवला होता. यात देवी-देवतांना आपल्या डोक्यावर घेऊन भणंग अवस्थेत पायीच भटकत नैवेद्य मागणारे जोगी-जोगतिणीपासून ते भविष्य सांगण्याच्या मोबदल्यात लोकांकडून पैसे लुबाडणारे किरकोळ लोक येतात. पण यात स्वतःचे संस्थीकरण करून त्याचे मोठ्या व्यवसायात रूपांतर करणारे आसारामबापू आणि निर्मलबाबा यांसारखे सेव्हन स्टार बाबादेखील होते. अनुयायांची प्रचंड संख्या, गडगंज संपत्ती आणि सत्तेपर्यंतची पोच या गोष्टी त्यांच्या पाठीशी आहेत. ते आपल्या अनुयायांना देशभरातील अनेक टीव्ही चॅनल्सवरती मार्गदर्शन करतात. उदाहरणार्थ निर्मलबाबा, ज्यांच्या विरोधात दाभोळकर अलीकडेच उतरले होते (निर्मलबाबा शोध-बोध हे त्यांचे You Tubeवरील भाषण पाहावे), ते त्यांचे सशुल्क कार्यक्रम घेत असत, निर्मल दरबार नावाचा त्यांचा कार्यक्रम साधारणपणे ४० वेगवेगळ्या चॅनेल्सवर चालतो, ज्यात -AXN, TV Asia, Star News, Sab TV अशा मोठ्या चॅनेल्सचाही समावेश आहे, ज्यावरून ते लोकांच्या समस्यांवर उपाय म्हणून आपली 'दैवी' कृपा विकत होते. त्यांच्या 'समागम' या कार्यक्रमाच्या तिकिटाचा दर २००० रु. असतो. या बुवा-बाबांपैकी अनेकजण हे लोकांना फसवण्याच्या केसेसपासून ते आपल्या स्त्री अनुयायांवर लैंगिक अत्याचार करण्याच्या आरोपापर्यंत विविध गुन्ह्यांत पकडले गेलेले आहेत. अगदी आता हा लेख लिहीत असताना दिल्लीच्या एका १६ वर्षांच्या मुलीने आसारामबापूवर बलात्काराचा

आरोप पोलिसांकडे नोंदवला आहे. कायद्याप्रमाणे या बापूला ताबडतोब अटक व्हायला हवी पण आठवडा उलटून गेल्यावर, त्यांच्या चिंधड्या टेलिव्हिजनवर लोकांसमोर उघड्या पडल्यावरसुद्धा त्यांवर कोणतीच कार्यवाही नाही. या बाबांचे हात एवढे पोचलेले असतात की त्यांना शिक्षा सोडा, त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पाहायची कोणाची साधारणतः हिंमत होत नाही. परिणामाच्या भीतीपोटी साहजिकच फारच थोडे लोक त्यांच्या विरोधात बोलण्याचे धाडस करतात; त्यांच्या विरोधात एखादा लोकजागृतीचा कार्यक्रम घेणे तर फारच दूरची गोष्ट! खून करणे सोडा, आपल्या अब्जोदीच्या साम्राज्याच्या रक्षणार्थ हे बाबालोक कोणत्याही थराला जाऊ शकतात हे सर्वांना माहीत आहे.

दाभोलकरांना महाराष्ट्र सरकारने अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा करावा असं वाटत होतं. त्यासाठी त्यांनी नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धात आपल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे स्वतःच्या देखरेखीखाली 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन' बिलाचा मसुदा तयार केला होता. त्या बिलाचा इतिहास अगदी रोचक म्हणावा असा आहे. त्याचे पुढच्या एका दशकात बरेच मसुदे बनले आणि त्यात तब्बल २९ सुधारणा घडल्या. सर्वप्रथम ते २००३ मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी ठेवण्यात आले. कॅबिनेटच्या संमतीसह ते त्यानंतर जेव्हा एप्रिल २००५ मध्ये विधिमंडळापुढे आले, तेव्हा खुद्द सत्ताधारी पक्षातर्फेच त्याला कडाडून विरोध झाला. विधिमंडळाच्या सूचनेप्रमाणे आणि १०० पेक्षा जास्त एमएलएंशी चर्चामसलत केल्यावर त्यातील प्रावधाने शिथिल करण्यात आली. आणि ते सुधारित बिल परत विधिमंडळाकडे पाठविण्यात आले. यावेळी ते विधिमंडळाने पास केले पण ते विधानपरिषदेत अडकले. विधानपरिषदेने त्याला जॉइंट सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला. या कमिटीच्या एकूण चार बैठका झाल्या आणि तिने जनतेकडून त्यावर आक्षेप आणि सूचना मागविल्या. त्यास प्रतिसाद म्हणून १ लाख १७ हजार प्रतिक्रिया आल्या. त्यातील ३८,८८७ या विरोधात तर ७८,८६९ या त्याच्या समर्थनात होत्या. २००९ च्या निवडणुकानंतर सरकार बरखास्त झाल्यानंतर हे बिलसुद्धा अपगत (lapse) झाले आणि मग ही संपूर्ण प्रक्रिया परत सुरू झाली. आता अगदी विरल स्वरूपात या बिलाला जुलै २०११ मध्ये परत कॅबिनेटसमोर आणण्यात आले. कॅबिनेटने त्याला संमती दिल्यावर ते या वर्षी ऑगस्टमध्ये विधिमंडळाकडे आले. पण दाभोलकर जाईपर्यंत ते तेथे चर्चेलासुद्धा आले नव्हते. या सर्व प्रक्रियेत मुळातील अंधश्रद्धा निर्मूलन बिल आता केवळ जादूटोणाविरोधी बिल बनले होते. पण तरीही त्याला सर्व हिंदू अतिरेकी संघटनांकडून आणि वारकरी पंथीयांकडून विरोध (जो या हिंदुत्ववादी संघटनांच्या चिथावणीवरून झाल्याचे अलीकडे उघडकीस आले आहे) झाला. त्यांनी दिलेले कारण हे या बिलामुळे त्यांच्या धार्मिक रूढी व चालीरीतींवर विपरीत परिणाम होणार असे होते. पण वास्तविकतः या बिलामध्ये असं वाटण्यासाठी काहीच आधार नव्हता. यातून या सनातनी संघटनांना असा कोणताही पुरोगामी सूरच मुळात नको होता हेच सिद्ध होते. स्वतः दाभोलकरांनी त्यांच्या शंकांचे निरसन करीत सांगितले होते की, या संपूर्ण बिलात 'देव' वा 'धर्म' याचा साधा उल्लेखसुद्धा केला गेलेला नाही. शिवाय धर्माचरणाचे आणि पूजाअर्चा करण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानातच समाविष्ट असल्यामुळे त्यावर या बिलामुळेच काय, कोणत्याही अशा संविधानात्मक मार्गातून आड येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण अशा तार्किकतेचा अतिरेकी मंडळींवर, जी त्यांच्या रक्तासाठीच तहानलेली होती, काय फरक पडणार होता? डॉ. दाभोलकरांच्या खुनाच्या निषेधाप्रीत्यर्थ अपेक्षेप्रमाणे सर्व महाराष्ट्रभर लोक रस्त्यावर आले. अनेक ठिकाणी त्यांनी राजकारण्यांना हुसकावून लावले. स्वतः मुख्यमंत्री पृथ्वाराज चव्हाण यांना, जेव्हा ते एक औपचारिकता

म्हणून दाभोलकरांच्या साताऱ्याच्या घरी आदरांजली वाहायला गेले, लोकांच्या रोषाला बळी पडावे लागले. या परिप्रेक्ष्यात क्षतिनियंत्रणाची कसरत म्हणून सरकारने या बिलातील प्रावधानांना रुजू करण्यासाठी एक वटहुकूम काढण्याचा निर्णय घेतला. वटहुकमाची वहिवाट आपल्या भारतीय लोकशाहीला काही अपरिचित नाही. पण वटहुकमांनासुद्धा जनप्रतिनिधींकडून अनुसंमती हवी असते. यानुसार जेव्हा हा वटहुकूम अनुसंमतीसाठी विधिमंडळाकडे येईल, त्यावेळी तो काही सहजासहजी पारित होईल असं दिसत नाही. कारण या प्रस्तावालाच त्वरित भारतीय जनता पक्षाकडून विरोध निर्देशित झाला.

या कायद्याला विरोध करणाऱ्या हिंदू जनजागृती समिती आणि सनातन संस्था यांचं म्हणणं आहे की, त्यातील संमिश्रित गुन्ह्यांवर कारवाई करण्यासाठी इंडियन पिनल कोडअंतर्गत अस्तित्वात असणारी कलमे पुरेशी आहेत. त्यांचा दुसरा युक्तिवाद असा आहे की, असे गुन्हे संख्येने अत्यल्प असल्यामुळे, अशा विशेष कायद्याची गरजच नाही. त्यासाठी ते सांगतात की मागच्या पाच वर्षांत मुंबईत अंधश्रद्धेसंबंधी फक्त १७ गुन्हे दाखल झालेत. हे युक्तिवाद किती तकलादू आहेत हे एखाद्या शाळकरी पोरालासुद्धा सहज कळेल. खरं तर त्यांच्या तपशिलातून अशा कायद्याची गरज प्रतिपादित होते. पण अशा तर्काचे या हितसंबंधी मंडळीस काय स्वारस्य?

डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे मारेकरी कोण हा प्रश्न हेमंत करकरेंचे मारेकरी कोण वा त्यासारख्या इतर अनेक प्रश्नांप्रमाणे एक अनुत्तरित कोडं म्हणून ठरण्याचीच दाट शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारने सारवासारव म्हणून त्यांच्या मारेकऱ्यांविषयी माहिती देणाऱ्याला दहा लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केल्यानंतरसुद्धा असं मानण्यास भरपूर वाव आहे. हे मी लिहीत असतानाच या घटनेला २४ तासांपेक्षा जास्त अवधी झाला आहे पण पोलिसांना त्याचा अजिबात थांगपत्ता नाही. खरोखरच ही केस इतकी बिकट आहे काय? किंवा दाभोलकरांसंबंधी इतर लेख वरवर वाचणाऱ्यांनासुद्धा या खुनामागे कोण असू शकतात याचा अंदाज बांधता येईल. पिस्तुलाच्या ट्रिगरवर बोट कोणाचेही असो, पण त्यामागे मेंदू कोणाचा याबाबत शंका घेण्यास मुळीच वाव नाही. ज्या लोकांनी दाभोलकरांच्या फोटोवर लाल क्रॉस मारला, ते संशयित ठरणार नाहीत काय? आसारामबापू, निर्मलबाबा यांसारख्या प्रस्थांविरुद्ध दाभोलकर जाहीरपणे बोलले, या बाबालोकांना पोलिसी इन्टेरोगेशनसाठी बोलावण्यात येऊ नये? तिसरे, जात पंचायतीच्या लोकांना दाभोलकरांनी उघडे पाडले. जरी ते पहिल्या दोन गटांपेक्षा तुलनात्मकतः फार दुर्बल असले तरी तेसुद्धा संभावित संशयित ठरू शकतात. या तीन लोकांशिवाय चौथ्या कोणाला या निरागस माणसाचा खून करावासा वाटणार? वास्तविकतः कोणत्या खूनखटल्यात यासारखे निश्चित स्वरूपात फक्त तीन संशयित लोक सापडतील? याशिवाय या खुनाला काही चश्मदिद साक्षीसुद्धा आहेत जरी त्यांनी साऱ्याच गोष्टी अपेक्षित स्वरूपात पोलिसांना दिलेल्या नसतील. इतर कोणत्याही केसमध्ये पोलिसांनी लगेच सर्व संशयितांना पकडून त्यांच्या 'पद्धती'ने बिड शोधले असते. कल्पना करा, दाभोलकरांऐवजी एखाद्या हिंदू बाबाचाच खून झाला, पापणी न हलवता पोलिसांनी डझनावर मुसलमान पोरांना पकडून किमान आठवडाभर झोडपून काढले असते. या केसमध्येसुद्धा त्यांना कोणी सईद वा बशिर या नावाचा पिस्तुलाचा चाप ओढणारा म्हणून सापडला तर आश्चर्य वाटायला नको.

डॉ. दाभोलकरांशी माझे व्यक्तिगत संबंध होते. तो एक सुजाण, सुस्पष्ट माणूस होता, आपण काय करतो याचे पुरेपूर भान त्याला होते. त्यांनी आपल्यासमोर अगदी मर्यादशील उद्दिष्ट ठेवले होते : या समाजाला अंधश्रद्धेच्या व्याधीपासून मुक्त करून वैज्ञानिकतेकडे प्रवृत्त करणे, जे कोणत्याही मूलभूत बदलाची पूर्वअट ठरावे. त्यांनी या उद्दिष्टांचा अगदी अनुकरणीय बांधिलकी व आस्थेने पाठपुरावा केला. माझ्या आशंकांना –

**(पृष्ठ क्र. ३८ वर)**

अस्वातंत्र्याचं वास्तव

# ‘शहरी माओवाद्यां’विषयी

आनंद तेलतुंबडे

महाराष्ट्रातील पुणे पोलिसांनी अलीकडे पाच कार्यकर्त्यांना अटक केली तेव्हा त्या कारवाईत दिसलेला सत्तेचा निर्लज्ज गैरवापर व निर्ढावलेपणा अनेकांना धक्कादायक वाटला. विद्यमान सरकारच्या सत्ताकाळात देशातील निराशेची भावना तशीही वाढतेच आहे, त्यात या घटनेने आणखी भर पडली. भारतामधील व बाहेरील अनेक लोकांनी या कारवाईचा वारंवार धिक्कार करूनही त्याचा सत्ताधाऱ्यांवर कोणताच परिणाम झालेला दिसत नाही. कायद्याला धरून कारवाई पुढे जाईल, अशी पोपटपंची तेवढी सरकारी प्रतिनिधींकडून ऐकायला मिळते. ‘बेकायदेशीर कृती (प्रतिबंधक) अधिनियम’ यूएपीए: अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज् (प्रीव्हेन्शन) ॲक्ट या जुलमी कायद्याद्वारे पोलिसांना अनिर्बंध अधिकार मिळतात– अटक करणं, अनेक आरोप दाखल करणं आणि न्यायालयात कायदेशीर प्रक्रिया रखडत असताना इकडे अटक झालेल्या व्यक्ती तुरुंगात खितपत पडतील, अशी तजवीज करणं पोलिसांना या कायद्यामुळे शक्य होतं. सर्वोच्च न्यायालयातही सर्व काही आलबेल नाही, अशी चिंता या न्यायालयातील चार ज्येष्ठ न्यायाधीशांनीच पत्रकार परिषद घेऊन लोकांसमोर व्यक्त केलेली असताना न्यायव्यवस्थेविषयी काय बोलावं? वंचितांच्या बाजूने लढणाऱ्या आणि राज्यसंस्थेच्या अभिजनवादी पक्षपातीपणाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना दडपण्यासाठी हे कायदे वापरले जातात, हे पुरेसं स्पष्ट झालेलं आहे. एकीकडे ‘ॲट्रॉसिटीविरोधी कायद्या’च्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम गैरवापराला आळा घालण्यासाठी सक्रिय झालेल्या न्यायव्यवस्थेने यूएपीएच्या गैरवापराकडे मात्र दुर्लक्ष केलं आहे. निःस्वार्थी मानवतावादाचं आदर्श रूप म्हणून ज्या व्यक्तींकडे पाहिलं जाईल अशांना शिक्षा करण्यासाठी हा कायदा वापरला जातो. वास्तविक, देशाच्या जनकांनी मांडलेल्या कल्पनेनुसार भारत एक इहवादी, समाजवादी, सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक असेल, हे घटनादत्त आश्वासन प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणारे हे लोक आहेत.

या समस्येचं मूळ वसाहतोत्तर राज्यसंस्थेच्या राज्यघटनेमध्येही सापडू शकतं. वासाहतिक शासनाची संपूर्ण यंत्रणा या राज्यघटनेने स्वीकारली. त्यात लोकशाहीच्या मुखवट्याआडचे जुलमी कायदेही होते. सत्तेत कोणताही पक्ष आला तरी सर्वच सरकारांनी या कायद्यांचा वापर केलेला आहे. त्यामुळे विद्यमान सरकारला मतभिन्नता चिरडण्यासाठी हे कायदे वापरणं सुकर झालं. काहीच दिवसांपूर्वी

मुंबईतून सुधीर ढवळे, नागपूरहून वकील सुरेंद्र गडलिंग, प्राध्यापिका शोमा सेन व महेश राऊत आणि दिल्लीतून रोना विल्सन यांना अटक करण्यात आलं, आणि त्यांच्या व इतर काही कार्यकर्त्यांच्या घरांवर छापे टाकण्यात आले. ही कारवाई ज्या प्रकारे झाली त्यावरून तथाकथित कायद्याच्या राज्यात किती हीन बेकायदेशीरपणा पसरला आहे हे दिसून येतं.

**भीमा–कोरेगावचा संदर्भ**

या अटकसत्राद्वारे पोलिसांनी घटनाक्रमाचं कथन वेगाने बदलण्याचा प्रयत्न केला असला, तरी हिंदुत्ववादी शक्तींनी १ जानेवारी २०१८ रोजी भीमा–कोरेगावला केलेल्या हिंसेचा संदर्भ यातून लपून राहिलेला नाही. या हिंसाचारात अनेक दलित जखमी झाले, अनेकांच्या मालमत्तेची हानी झाली आणि एका मराठा तरुणाचा जीव गेला. आदल्याच दिवशी पुण्यात झालेल्या एल्गार परिषदेच्या पार्श्र्वभूमीवर हे घडलं. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पी.बी. सावंत आणि मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांनी या परिषदेचं आयोजन केलं होतं. भीमा–कोरेगाव लढाईच्या दोनशेव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील साधारण दोनशे उदारमतवादी व दलित संघटना सहभागी झाल्या. ब्राह्मण पेशव्यांच्या दडपशाहीला संपवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी हा विजयी लढा दिल्याची दलितांची धारणा आहे. भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) 'नवपेशवाईला गाडण्या'चं व पुन्हा कधीही त्यांना मतदान न करण्याचं आवाहन या वेळी करण्यात आलं. भाजपचं सरकार ब्राह्मणी सत्तेचं पुनरुज्जीवन असल्याची दलित व अल्पसंख्यांच्या मनातील भावना आहे. यातून स्वाभाविकपणे हिंदुत्ववादी शक्ती नाराज झाल्या आणि कोरेगावमधील विजयस्तंभाजवळ मोठ्या संख्येने जमलेल्या दलितांना धडा शिकवण्याचं त्यांनी ठरवलं. संभाजी महाराजांच्या समाधीजवळ गोविंद गोपाळ गायकवाड यांचीही समाधी आहे, त्यावरून वाद निर्माण करून मराठ्यांना दलितांविरोधात चिथावणी देण्याचं काम या हिंदुत्ववादी शक्तींनी केलं. औरंगजेबाने १६८९मध्ये संभाजी महाराजांवर अत्याचार करून त्यांची हत्या केली. एका दंतकथेनुसार, संभाजी महाराजांवर अंत्यसंस्कार करण्याचे औरंगजेबाने दिलेले आदेश मानण्यास गायकवाड यांनी नकार दिला आणि या जागेवर संभाजीची समाधी बांधली. २९ डिसेंबर २०१७ रोजी या समाधीजवळचा फलक काढून टाकण्यात आला आणि त्यावरील कमानीचीही नासधूस करण्यात आली. एक जानेवारीला झालेल्या हल्ल्यासाठी हे निमित्त ठरलं.१ सुषमा ओव्हाळ नावाच्या महिलेने या प्रकरणी ४९ लोकांविरोधात तक्रार दाखल केली. फलक व कमानीची नासधूस करणं, समाधीचा अवमान करणं आणि 'जातीयवादी टिप्पणी' करणं, अशा आरोपांखाली 'अॅट्रॉसिटीविरोधी कायद्या'नुसार गावच्या सरपंच रेखा शिवले, उपसरपंच संजय शिवले, आणि माजी सरपंच सुनिता भंडारे यांच्याविरोधात तक्रार दाखल झाली. ओव्हाळ यांच्या तक्रारातील शेवटच्या ओळीत हिंदुत्ववादी नेते मिलिंद एकबोटे यांचाही उल्लेख होता, पण पोलिसांच्या प्रथम माहिती अहवालात (एफआयआर: फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट) हा उल्लेख काढून टाकण्यात आला.२ याउलट, आपण एक जानेवारीला एकत्र जमलो असताना दलितांनीच आपल्याला धमकी दिल्याचा आरोप करत शिवले यांनी प्रतितक्रार दाखल केली.

हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी एक जानेवारीला भीमा–कोरेगावच्या दिशेने यात्रा काढली तेव्हा दंगल सुरू झाली.३ दोन जानेवारीला एकबोटे व संभाजी भिडे यांच्याविरोधात पिंपरी पोलिस स्थानकात एक एफआयआर नोंदवली केली. 'अॅट्रॉसिटीविरोधी कायदा', भारतीय दंडविधानातील कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न), दंगल घडवणं, इत्यादी तरतुदींच्या संदर्भात अनिता रवींद्र सावळे यांनी ही तक्रार दाखल केली होती. याचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी कारवाई करणं

आवश्यक होतं. एकबोटे हे १९९७ ते २००२ या काळात पुण्यातून भाजपचे नगरसेवक राहिलेले होते, आणि त्यांच्याविरोधात दंगलीचे, अतिक्रमणाचे व गुन्हेगारी धमकावणीचे आणि दोन समुदायांमध्ये वैरभाव निर्माण करायचा प्रयत्न केल्याचे १२ गुन्हे दाखल झालेले आहेत. यातील पाच प्रकरणांमध्ये त्यांचा गुन्हा सिद्धही झाला. त्यांचं संपूर्ण कुटुंबच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहे. २००७ साली नागरी निवडणुकांमध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर त्यांनी हिंदू एकदा आघाडीची स्थापना केली. संघाचे माजी प्रचारक व शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेचे संस्थापक संभाजी भिडे यांनी पश्चिम महाराष्ट्रात अनेक हिंदुत्ववादी अभियानं हाती घेतलेली आहेत. या दोघांच्या अटकेची मागणी दलितांनी सातत्याने केली, पण पोलिसांनी त्यासंबंधी कोणतीही पावलं उचलली नाहीत. तीन महिन्यांच्या कालावधीत एकबोटे यांनी कनिष्ठ न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत सगळीकडे अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी खटपट केली. एकबोटेंविरोधातील तपासामध्ये गलथानपणा दाखवण्याबद्दल राज्य सरकार व तपाससंस्थांवर न्यायालयाने ताशेरे ओढले. एकबोटे कथितरित्या 'सापडत नसल्या'चा तपाससंस्थांचा दावाही संशयास्पद असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. शेवटी, एकबोटे यांचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने नाकारल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली आणि महिन्याभरानंतर लगेच जामिनावर सोडून दिलं.

**पोलिसांच्या कथनातील अदलाबदल**

२९ डिसेंबर रोजी झालेल्या घटनेतून संकेत घेत पोलिसांनी एक जानेवारीचं संभाव्य संकट थोपवण्यासाठी पुरेसा ताफा तैनात करायला हवा होता, पण तसं न करताना त्यांनी दंगेखोरांना मोकळी वाट काढून दिली. नावं समोर आलेल्या अपराध्यांविरोधात त्यांनी कारवाईही केली नाही. उलट, एल्गार परिषदेतील भडकाऊ भाषणांमुळे हिंसाचारा घडल्याचं ध्वनित करायला पोलिसांनी सुरुवात केली. चिथावणीखोर भाषणांद्वारे लोकांना कथितरित्या भडकावल्याचा आरोप ठेवून गुजरातमधील आमदार जिग्नेश मेवानी व विद्यार्थी नेता उमर खालिद यांच्याविरोधात दोन जानेवारीला तक्रार दाखल करण्यात आली. एका तासाच्या कालावधीत या दोघांच्या भाषणांची तपासणी शक्य होती. त्यामध्ये काहीच चिथावणीखोर नव्हतं. अपराध्यांना पाठीशी घातलं जात असल्याबद्दल निषेध-निदर्शनं वाढू लागल्यावर पोलिसांनी १७ एप्रिल रोजी कबीर कला मंचामधील रुपाली जाधव, ज्योती जगताप, रमेश गायचोर, सागर गोरखे, धवला ढेंगळे या कार्यकर्त्यांच्या पुण्यातील घरांवर आणि मुंबईत रिपब्लिकन पँथरचे कार्यकर्ते सुधीर ढवळे व हर्षाली पोतदार यांच्या घरी छापे टाकले. त्याचप्रमाणे सुरेंद्र गडलिंग, शोमा सेन व रोना विल्सन यांच्या घरांवरही छापे टाकण्यात आले- त्यांचा एल्गार परिषदेशी दुरान्वयेही संबंध नव्हता. सर्च वॉरन्टमध्ये 'भीमा-कोरेगाव'चा स्पष्ट उल्लेख होता, पण या लोकांचा भीमा-कोरेगावशी काही संबंध नसल्याचं मुख्यमंत्र्यांनीही म्हटलं. सहा जून रोजी पोलिसांनी यातील चौघांना आणि महेश राऊत यांनाही अटक केली. पंतप्रधान ग्रामीण विकास अभ्यासवृत्ती मिळालेल्या महेश राऊत यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमधून शिक्षण घेतल्यानंतर गडचिरोलीतील आदिवासींच्या जीवनासाठी स्वतःला वाहून घेतलं आहे. एल्गार परिषदेचं आयोजन व निधीपुरवठा माओवाद्यांनी केल्याची कपोलकल्पित कहाणी पोलिसांनी तयार केली. या परिषदेचं आयोजन न्यायमूर्ती सावंत यांच्यासोबत आपण केलं होतं, असं स्पष्टीकरण कोळसे पाटील यांनी वारंवार देऊनही माध्यमांनी त्याकडे दुर्लक्ष केलं, आणि पोलिसांनी पुढे ठेवलेली कहाणी सातत्याने पुढे आणली. यामध्ये कोणताही पैसा खर्च झालेला नाही आणि अटक झालेल्या व्यक्तींचा याच्याशी फारसा संबंध नाही,

असं कोळसे पाटील यांनी स्पष्ट केलं होतं.

पोलीस उपायुक्त रविंद्र कदम यांनी सहा जून रोजी पत्रकार परिषद घेतली आणि पोलीस तपासाविषयीचं स्पष्टीकरण दिलं. अटक झालेल्या पाच व्यक्तींविरोधातील आरोपांमधील छोटामोठा तपशील त्यांनी या वेळी सादर केला. पुण्यात ३१ डिसेंबर रोजी झालेल्या 'एल्गार परिषदे'च्या संदर्भातच या पाच जणांना अटक झाल्याचं त्यांनी पुन्हा ठासून सांगितलं. या परिषदेला माओवादी संघटनांकडून निधी पुरवला गेला होता आणि दलित-मराठा यांच्यात हिंसक संघर्षही यातूनच निर्माण झाला, असा दावा त्यांनी केला. दुसऱ्या दिवशी, आरोपींना न्यायालयात दाखल केलं जाण्यापूर्वीच कथितरित्या रोना विल्सन यांच्या लॅपटॉपमध्ये मिळालेली दोन पत्रं माध्यमांना उपलब्ध करून देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट या पत्रांमध्ये चर्चिला गेला होता. या पत्रांवर विविध माध्यमांमधून तावातावाने चर्चा करण्यात आली. पोलिसांची ही कृती मुंबई उच्च न्यायालयाने ७ नोव्हेंबर २०१४ रोजी काढलेल्या परिपत्रकाला छेद देणारी होती. मुंबई उच्च न्यायालयाने घालून दिलेला कायदा व महाराष्ट्र पोलिसांचं परिपत्रक यांचा स्पष्ट भंग करणारी ही कारवाई असल्याचं फौजदारी वकिलांचं म्हणणं आहे.४ न्यायालयाने २०१४ सालचे बंधनकारक आदेश राहुल ठाकूर यांच्या याचिकेवरून दिले होते. त्यांनी असं म्हटलं आहे की, उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात व सरकारी वकिलाविरोधात न्यायालयीन अवमानीची याचिका अटक झालेल्यांनी दाखल करावी.

कथितरित्या एका बंदी असलेल्या भूमिगत पक्षाने लिहिलेल्या आणि तिच्या समर्थकांनी जतन करून ठेवलेल्या या 'चमत्कारिक' पत्रांच्या अस्सलतेविषयी राजकारण्यांनी, माजी पोलीस अधिकाऱ्यांनी व अनेक विश्लेषकांनी शंका उपस्थित केली आहे. यातील पहिल्या पत्रात पक्षाचा कट उघडपणे नोंदवलेला होता, त्यात लोकांची खरी नावं नमूद केलेली होती आणि त्यांचे दूरध्वनी क्रमांकही नोंदवलेले होते. दुसऱ्या पत्रातील सूर आणखी चढा होता- राजीव गांधींप्रमाणे नरेंद्र मोदींची हत्या करण्याचा उल्लेख त्यात होता. मोदींची लोकप्रियता घसणीला लागल्यावर हत्येच्या कटाची ही कहाणी पुढे आणण्यात आली, जेणेकरून लोकांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण होईल, याकडे अनेक भाष्यकारांनी निर्देश केला आहे. माओवाद्यांनी अशा रितीने 'वर्गशत्रूचा नायनाट' करण्याची व्यूहरचना पन्नास वर्षांपूर्वीच सोडल्याचं या कहाणीच्या लेखकांना अर्थातच माहीत नसणार. आणि जेव्हा ही व्यूहरचना ते मानत होते तेव्हाही इतक्या आत्मघातकीपणे तिची अंमलबजावणी झाली नव्हती.

**शहरी माओवादी**

लोकांच्या- विशेषतः दलित, आदिवासी, स्त्रिया व अल्पसंख्याकांच्या लोकशाही अधिकारांचं संरक्षण करण्यासाठी निःस्वार्थी कृतिशीलता दाखवणाऱ्या या पाचही लोकांची कामगिरी अनुकरणीय आहे. त्यांची अकादमिक व व्यावसायिक विश्वासार्हता श्रेष्ठ दर्जाची आहे, त्याच्या जोरावर त्यांना आरामदायी जीवन जगणं सहज शक्य होतं. पण त्यांनी आत्मप्रेरणेतून साधेपणाने जगण्याचा व लोकांची सेवा करण्याचा मार्ग निवडला. या संपन्न भूमीला ओरबाडणाऱ्या व बहुसंख्यांना त्याची झळ सहन करायला लावणाऱ्या उतावीळ राजकारणाशी हे लोक साहजिकपणेच सहमत नाहीत. संस्थांचा विध्वंस, राज्यघटनेतील प्रेरणेशी छेडछाड, मतभिन्नतेला दडपणं, विशिष्ट लोकांना दूर लोटणं आणि त्यांना झुंडीने मारहाण करण्यासाठी टोळ्या मोकाट सोडणं, अशा कृतींचं समर्थन ते कसं करू शकतील? 'शहरी माओवादी' ही कल्पित कथा आहे, त्याला कोणतीही रूपरेषा नाही किंवा कायदेशीर चौकट नाही. लोकांच्या हीन भावनेला उत्तेजित करण्याच्या उद्देशाने ही कहाणी

रचण्यात आलेली आहे. प्रत्येक विचारी भारतीय हा संभाव्य 'शहरी माओवादी' आहे. केवळ पोलिसांच्या कृपेमुळे या सर्वांना अटक होत नाही, इतकंच.

●

**टिपा:**

१ चंदन शांताराम हयगुंडे, 'रिमूव्हल ऑफ महार समाधी बोर्ड नीअर पुणे स्पार्क्ड क्लॅशेस,' इंडियन एक्स्प्रेस, ४ जानेवारी २०१८.

२ उपरोल्लेखित.

३ मकरंद गाडगीळ व अलका धूपकर, मुंबई मिरर, ३ जानेवारी २०१८, https://mumbaimirror. indiatimes.com/mumbai/cover-story/the-twowho-brought-your-city-to-a-halt/articleshow/62344275.cms.

४ सौरव दत्ता, मोदी असॅसिनेशन प्लॉट: बाय लिंकिंग लेटर्स, पुणे पोलीस वेन्ट अगेन्स्ट हाय कोर्ट डायरेक्शन्स, Scroll.in, १२ जून २०१८.

(दि. ३० जून २०१८च्या इपीडब्ल्यूमधील लेखाचा मराठी अनुवाद **अवधूत डोंगरे** यांनी केला आहे.)

## दाभोलकरांचाही गांधी केला (पान नं ३३ वरून)

श्रद्धा व अंधश्रद्धा यांत केवळ एक बारीक रेषा असते आणि अंधश्रद्धेसारख्या व्यापक धार्मिक-सांस्कृतिक दुष्ट प्रथेला, जी जनतेवरील आर्थिक अरिष्टाच्या वाढत्या तीव्रतेबरोबर वाढत जाणार आहे, एखादा कायदा खरोखरच उपाय ठरेल काय; कारण जातीसंबंधित कित्येक कायदे कसे निष्क्रिय ठरले याचा आपल्याला कटु अनुभव आहे – ते एका वाक्यात त्याला प्रतिसाद देत की आपल्याला कुठे ना कुठे सुरुवात करायची आहे. नंतर काहीशा मिस्किलपणे त्याला जोड देत ते म्हणत की, त्यांनी माझ्यासारखी क्रांतीची आकांक्षा बाळगलेली नाही.

आपल्या ठाम वैज्ञानिक निष्ठेमुळे दाभोलकर निश्चितच गांधींसारखे नव्हते. पण तरीही अनेकदा ते गांधींसारखे बोलत. १९८०मध्ये सामाजिक कार्याला सुरुवात केल्यापासून त्यांनी धमक्या आणि प्रसंगी शारीरिक हल्ल्यांना सातत्याने तोंड दिले. पण कधीही त्यांनी त्यासाठी पोलीस संरक्षण स्वीकारले नाही. टाइम्स ऑफ इंडियात प्रकाशित त्यांचे याबाबतीत स्पष्टीकरण होते, ''जर मला माझ्या देशात माझ्याच लोकांकडून पोलीस संरक्षण घ्यावं लागलं, तर मला वाटेल की माझ्यातच काही दोष असावा. मी भारतीय घटनेच्या चौकटीतच आपले संघर्ष करतो आहे; जे कोणाच्याही विरोधात नाहीत. किंबहुना ते सर्वांच्याच फायद्याचे आहेत.'' त्यांच्या हिंदुत्ववादी विरोधकांना, ज्यांनी त्यांना गांधी बनविण्याचे ठाणले असल्यामुळे, त्यांच्या गांधी असण्याचा वा नसण्याच्या पेचाशी काय स्वारस्य? मारेकऱ्यांच्या गोळीनं त्यांचं दाभोलकरांना गांधी करण्याचं उद्दिष्ट साध्य झालं. फरक एवढाच की यावेळी आपल्याला कदाचित नथुराम सापडला नाही!

●

(दि. १ सप्टेंबर २०१३च्या वाटसरूमधून पुनर्मुद्रित. मराठी अनुवाद **वनराज शिंदे** यांनी केला आहे.)


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याची ठिकाणे**

माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

# स्वातंत्र्याची कल्पना आणि अस्वातंत्र्याचं वास्तव

आनंद तेलतुंबडे

भारत म्हणजे मूर्तिमंत विरोधाभास आहे. नैसर्गिक संपदेने समृद्ध, श्रीमंत असणारा देश म्हणजे भारत आणि त्याच वेळी गरिबी, वंचितता यांचेही आगर असणारा देश म्हणजे भारत! यातून उदात्त सिद्धान्त आणि भयानक वास्तव पुढे येते. भारताच्या उदारमतवादी संविधानाच्या सरनाम्यात भारतीय जनतेचा अभिमानपूर्वक उल्लेख करण्यात येत आहे. 'भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस-सामाजिक स्वातंत्र्य, दर्जाची, संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मिकता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्तित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करत आहोत.' वास्तवात मात्र गेल्या सहा दशकांतील संविधानाची कामगिरी हास्यास्पद झाली आहे. गेल्या अनेक वर्षांत हा विरोधाभास वाढतच गेला आहे. हा विरोधाभास म्हणजे लोकशाही व स्वातंत्र्याची मोजलेली किंमत आहे अशी लोकांनीही स्वतःची समजूत घालून घेतली आहे. मात्र १९९० च्या सुरुवातीस नवउदारमतवादी सुधारणांच्या आगमनानंतर लोकांनी लोकशाहीचा पाडाव आणि त्यांच्या स्वातंत्र्याची झपाट्याने घसरण झालेली पाहिली आहे. साधारण अनुभव असा आहे की, या संकल्पना अधिकाधिक अडचणीच्या झाल्या आहेत.

### स्वातंत्र्याची कल्पना

प्लेटो, कान्टपासून ते हेगेलपर्यंतच्या तत्त्ववेत्त्यांनी स्वातंत्र्य महत्त्वाचे मानले आहे. रूडॉल्फ स्टेनर यांनी 'द फिलॉसॉफी ऑफ फ्रीडम' या आपल्या उल्लेखनीय लेखनात स्वातंत्र्याची चर्चा करताना 'मुक्त इहा' (षीशश ुळश्रश्र) संकल्पनेवर भर दिला आहे. स्टेनर यांच्या मते विचार, चिंतनाच्या रचनात्मक कार्याच्या सहाय्याने स्वातंत्र्यामार्फत पोहोचता येते. आपले स्वतःचे आणि जगाचे स्वरूप पूर्ण जाणिवेसह कृती करण्याचे प्रत्यक्ष कार्य यामध्ये जाणीवपूर्वक शिरकाव करणारी ही आत्मिक कृती आहे. स्टेनर यांनी सुरुवातीला मुक्त इहेची समस्या विचारस्वातंत्र्य आणि कृतिस्वातंत्र्य यात विभागली आहे. जगाचे बाह्य रूपाचे प्रतिबिंब या स्वरूपात आपल्याला होणारे आकलन आणि जगाच्या अंतर्गत संरचनेपर्यंत पोहोचणारे आपले ज्ञान यातील अंतर सांधता आले तर त्यातून अंतर्गत स्वातंत्र्य मिळवता येते असे त्यांचे म्हणणे

आहे. बहिर्गत स्वातंत्र्य, आपले आदर्श आणि त्यावरील बाह्य वास्तवाची मर्यादा यातील दरी सांधून प्राप्त होते. स्टेनर ज्याला नैतिक कल्पना म्हणत आहेत त्यापासून आपल्या कृतींना प्रेरणा मिळवून हे अंतर भरून काढता येईल. स्टेनर यांच्या मते अंतर्गत आणि बहिर्गत स्वातंत्र्य एकमेकांस पूर्णत्व देतात आणि खरे स्वातंत्र्य या दोघांच्या एकत्र येण्यातून संपादन करता येते. उदाहरणार्थ थॉमस हॉब्ज यांच्या मते, 'मुक्त माणूस म्हणजे असा माणूस की त्याला जे करायची इच्छा आहे ते करण्यापासून अटकाव होऊ नये.'

नंतर स्वातंत्र्यावर सामाजिक कराराशी संबंधित आदर्श आणि निसर्ग अवस्थेविषयीच्या विधानांचा प्रभाव पडलेला दिसतो. याबाबतची चर्चा साधारणपणे सकारात्मक स्वातंत्र्य आणि नकारात्मक स्वातंत्र्य या भाषेत होताना दिसते. समाजाच्या संरचनात्मक बंधनांच्या बंधनांशिवाय स्वतःची इच्छा पूर्ण करण्याची सत्ता आणि संसाधने असणे या अर्थाने व्यक्तीने 'साधन स्वरूपा'त वापरायच्या त्याच्या क्षमतेमध्ये स्वातंत्र्य समाविष्ट असते याला सकारात्मक स्वातंत्र्य म्हटले आहे. नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे दुसरी व्यक्ती तिच्या वा त्याच्या गोष्टींत लुडबूड करू शकत नाही त्या क्षेत्रामध्ये मर्यादेमध्ये एखादा स्वतंत्र असणे होय. या कल्पनेला प्रमुख चालना फ्रेंच राज्यक्रांतीपासून मिळालेली दिसते. हेगेल यांच्या मते लिखित इतिहासात प्रथमच युरोपीय समाजांना खऱ्या अर्थाने व्यक्तीच्या राजकीय स्वातंत्र्याची ओळख या क्रांतीतून झाली. नंतर १० डिसेंबर १९४९ साली राष्ट्रसंघाने मांडलेल्या मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यात या कल्पनेला अधिक मान्यता मिळाली. या जाहीरनाम्यात जीविताचा अधिकार, स्वातंत्र्य व व्यक्तीच्या सुरक्षेचा अधिकार, क्रूर छळापासून स्वातंत्र्य, अमानवीय शिक्षांपासून मुक्ती, विचारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य यांचा उल्लेख आहे. मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा सर्व व्यक्तीमध्ये असणाऱ्या मूलभूत प्रतिष्ठेवर आधारित आहे. सर्व स्त्री-पुरुषांचे समान हक्क आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराची हमीही या जाहीरनाम्यात दिलेली आहे. या जाहीरनाम्याने राज्याच्या सत्तेपुढे मानवी हक्कांना प्राधान्य दिलेले आहे. राज्यांना अधिकारांवर नियंत्रण ठेवता येते मात्र त्यांचे उल्लंघन करण्यास मनाई आहे. भारत राष्ट्रसंघाचा सदस्य असल्याने भारतासही राष्ट्रसंघाची सनद तसेच मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा बंधनकारक आहे. त्यामध्ये मानवी अधिकारांचा सन्मान राखणे, वंश, भाषा, लिंग वा धर्माआधारे भेदभाव न करता सर्वांना मूलभूत स्वातंत्र्य देण्याची तरतूद आहे.

**संवैधानिक स्वातंत्र्याची उत्पत्ती**

भारतात ब्रिटिशविरोधी स्वातंत्र्यलढ्यातून स्वातंत्र्य शब्द सर्वपरिचित झाला. भारतात स्वातंत्र्याचा विचार 'स्वराज्य' म्हणून पुढे करण्यात आला तरी तो ब्रिटिशांच्या देश सोडून जाण्याशी संबंधित होता. १९४७ मध्ये जेव्हा ब्रिटिशांकडून काँग्रेस पक्ष उगवता भांडवलीवर्ग व जमीनदारी हितसंबंधांचे प्रतिनिधी यांच्याकडे सत्तांतर झाले. 'आपण स्वतंत्र झालो' सांगून लोकांना जल्लोष करण्यास सांगण्यात आले. असंख्य जाती, भाषा, धर्म, वंश यामध्ये विभाजलेली, वेगवेगळ्या प्रांतांत राजकीय व्यवस्थांत (ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेश आणि पाचशे संस्थाने) यांमध्ये विखुरलेली राजनीती. तिने शासनव्यवहाराच्या अंमलाखाली सरनाम्यातील उदात्त दृष्टीसह ध्येयांसह उदारमतवादी संविधान स्वीकारले. वसाहतवादी राज्याचा उदारमतवादी ठसा आणि बोल्शेव्हिक क्रांतीचा नव्या राजवटीवरही परिणाम झाला. संविधानाने सार्वभौमत्व लोकांमध्ये निहीत करून भारताला गणराज्य म्हणून घोषित केले. 'लोक' त्याचे खरे मालक होते. काल्पनिक राष्ट्राच्या समान भवितव्यावर श्रद्धा ठेवण्यासाठी लोकांना एकत्र आणण्यासाठीची ही युक्ती होती. ही मालकी गाजवण्यासाठी लोकांकडे मार्गच नाही याची हमी सत्ताधारी वर्गांना देण्यात आली होती. ही मालकी ते स्वतः वा त्यांचे प्रतिनिधी यामार्फत

जनतेचे प्रतिनिधी म्हणून गाजवत होते.

भारतीय संविधानात स्वातंत्र्याचा अधिकार अनुच्छेद क्र. १९, २०, २१ आणि २२ मध्ये दिलेला आहे. यात वैयक्तिक अधिकार महत्त्वाचे मानले असून त्यांची हमीही देण्यात आली आहे. अनुच्छेद क्र. १९ मध्ये सहा स्वातंत्र्य देण्यात आली आहेत. १) भाषण आणि उच्चारस्वातंत्र्य, २) शस्त्राशिवाय शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, ३) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, ४) भारतीय हद्दीत मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य, ५) भारतीय हद्दीत कोठेही निवास व वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आणि ६) कोणताही व्यवसाय, उद्योग, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य. तसेच संविधानामध्ये जीविताचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचीही हमी देण्यात आली आहे. त्यामध्ये हे अधिकार लागू होण्यासाठीच्या विशिष्ट तरतुदींचाही उल्लेख आहे. या अधिकारांत सर्वसाधारण परिस्थितीत अटक झालेल्या व्यक्तीच्या अधिकारांचाही समावेश होतो. २००२ सालापासून ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार अनुच्छेद क्र. २१ (अ)चा संविधानात समावेश करण्यात आला आहे. यानुसार प्राथमिक शिक्षणाच्या अधिकाराचा समावेश स्वातंत्र्याच्या अधिकारात केला आहे. सहा ते चौदा वर्षांतील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने द्यावे या तरतुदीचा समावेश आहे. या स्वातंत्र्यावर आणि अधिकारांवर संविधानाने बंधनेही घातली आहेत. भारताचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, एकात्मता, सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता या दृष्टीने ही बंधने घालण्यात आली आहेत. जीवित आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार मात्र याला अपवाद आहे. सहा स्वातंत्र्यांवर मात्र आणीबाणीदरम्यान स्थगिती आणली जाते.

### अ-स्वातंत्र्याचे वास्तव

भारतीय राज्य संविधान मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा, राष्ट्रसंघाच्या आमसभेने १६ डिसेंबर १९६६ रोजी स्वीकारला व २३ मार्च १९७६ पासून अंमलात आणलेल्या 'नागरी व राजकीय अधिकारांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' या साऱ्यांनुसार स्वातंत्र्याचा भारतीयांना अधिकार देण्यास कटीबद्ध आहे. मात्र बहुसंख्य लोकांच्या अनुभवाआधारे बोलायचे तर कामगिरीत मात्र राज्याने ह्या तरतुदी पाळण्यापेक्षा त्या भंग केलेल्याच दिसून येतील. आधुनिक संविधानाच्या सुरुवातीनंतरही उच्चस्तरीयांना अधिकार आणि खालच्या स्तरातील लोकांवर बंधने देणारी परंपरागत जातिव्यवस्थेची सामाजिक संरचनाच अनेक मार्गांनी बळकट झालेली दिसते. परिणामतः ज्यांच्यासाठी हे अधिकार अधिक महत्त्वपूर्ण आहेत त्यांनाच ते नाकारण्यात आलेले दिसतात. राज्याचे वर्गीय चारित्र्य पाहता ह्या अधिकारांचे पालन करण्यापेक्षा उल्लंघन करण्याची प्रवृत्ती १९७० च्या मध्यापर्यंत दिसून येते. १९४७ नंतरच्या विकासासंबंधी पॅराडाइममुळे राजकीय विसंगतीला उत्तेजना मिळाली व त्यातून दोन वर्षे आणीबाणी लादण्यात आली. त्यावेळी सर्व अधिकार स्थगित करण्यात आले. १९७७ मध्ये आणीबाणी उठल्यानंतर अधिकारांची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न झाला तरी त्यानंतर अधिकारांची घसरण ही होतच राहिली. पुढे नवउदारमतवादी सुधारणांच्या आगमनाबरोबर या घसरणीला गती मिळाली. गेल्या दोन दशकांतील श्रेष्ठजनवादी डावपेचांमुळे पेचप्रसंग निर्माण झाला त्याचा थेट परिणाम लोकांच्या स्वातंत्र्याच्या बिकट अवस्थेवर झाला.

विविध स्वातंत्र्याविषयीचे संवैधानिक अधिकार मात्र प्रत्यक्षात बहुसंख्य लोकांना नाकारण्यात आले आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, लोकांच्या लोकशाहीवादी प्रतिकार विरोधांची मुस्कटदाबी अनेक कायद्यांमार्फत झाली आहे. जसे-आर्म्ड फोर्सेस (स्पेशल पॉवर) ॲक्ट १९५८, मेन्टेनन्स ऑफ इंटरनल सिक्युरिटी ॲक्ट १९७१, नॅशनल सिक्युरिटी ॲक्ट १९८०, प्रिव्हेंटिव्ह डिटेन्शन ॲक्ट १९५०, पिव्हेंन्शन ऑफ टेररीझम ॲक्ट २००२, प्रिव्हेंन्शन ऑफ टेररीझम ऑर्डिनन्स ॲक्ट २००१,

टेररिस्ट अफेक्टेड एरिया (स्पेशल कोर्टस) ॲक्ट १९८४, टेररिस्ट अँड डिस्परेक्टिव्ह ॲक्टिव्हिटीज (प्रिव्हेन्शन) ॲक्ट १९८५, अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज (प्रिव्हेन्शन) ॲक्ट १९६७ आणि इतर. लोकशाहीशी घनिष्ठ संबंध असणाऱ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची अभिव्यक्तीही आझाद मैदान, मुंबई वा दिल्लीतील जंतर मंतर या जागांपुरतीच मर्यादित आहे. तेथेही पोलिसांची नजर, पहारा असतोच. एकत्र जमण्याच्या, संघटित होण्याच्या स्वातंत्र्याची, संघटना स्वातंत्र्याची नोकरशाही प्रक्रियांद्वारे गळचेपी झाली आहे. आणि त्या संघटनांनी जर मूलगामी परिवर्तनाची भाषा केली तर त्यांना निर्घृणपणे चिरडलेही जाते. धर्मविषयक स्वातंत्र्याला गुजरात, कर्नाटक राज्यांच्या धर्मांतरविरोधी कायद्यांनी थेट आव्हान निर्माण केले आहे. मुख्य प्रवाहातील पक्षांकडून बहुसंख्याक जमातवादाचा उघडपणे होणारा वापर, त्याला असणारी राज्याची मूक संमती यामुळे धर्मस्वातंत्र्य अर्थहीन बनले आहे. लोकांना कोठेही राहण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र ते गरिबांना उपलब्ध नाही! ते मात्र महाराष्ट्रातील शिवसेना, मनसेसारख्यांकडून त्रास सहन करत असतात. हवा तो व्यवसाय करण्याच्या स्वातंत्र्यावर अजूनही जातिग्रस्त समाज संरचनेचा पगडा असल्याने असंख्य तळागाळातले लोक त्यापासून वंचित आहेत. त्यांच्या उन्नतीची शिक्षण, रोजगार, जमीन यासारखी साधनेही जातिग्रस्त आहेत–जातींवर अवलंबून आहेत. पोलीस माओवादी समजून अटक करतात वा मार्क्स, लेनिन, माओ, भगतसिंग आणि अगदी आंबेडकरांचीही पुस्तके जप्त करतात, तेव्हा विचारस्वातंत्र्याची खरी अवस्था पुढे येते. मात्र हजारोंचे जीव घेणाऱ्या, राजनीतीमध्ये विष कालवणाऱ्या हिंदुत्वाबाबत मात्र सहनशीलता दाखवली जाते आणि नक्षलवादाला अंतर्गत सुरक्षेचा सर्वात मोठा धोका मानले जाते.

थोडक्यात राज्याच्या तसेच नागरी समाजाच्या संरचनात्मक तसेच प्रक्रियांच्या पातळीवर भारतीय लोक मोठ्या प्रमाणावर अस्वातंत्र्याचाच अनुभव घेत आहेत. स्वातंत्र्याबाबत जे बोललं जातं ते केवळ मूठभर श्रेष्ठीजनांसाठी आहे. तर इतरांना लोक म्हणून असणारे अस्तित्वच नाकारले आहे.

●

(दि. १६ फेब्रुवारी २०११च्या वाटसरूमधून पुनर्मुद्रित. मराठी अनुवाद **चित्रा लेले** यांनी केला आहे.)


प रि व र्त ना चा

वाटसरू

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्च अक्षरात लिहिलेले
वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड
फाँटमध्ये पाठवावे.